
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क. १२८९२

१

# गांधीजींचें जीवनदर्शन



IRBK-0112812

दा. २५. १२८१२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

# गांधीजी

... वाचनालय शाखा.
अनु. ७००७० दि. ७।७७।११:६५
क्रमांक 93०८ नोंद दि. 20।5।६८

* *

जीवनदर्शन

भाऊ धर्माधिकारी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क. 92692 नों. दि.
कि. ५।०० ...

दीड रुपया

IRBK-0112812

वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २

श्री : ६२० [ १–६९ ]

◻ ◻

© १९६९

बोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि

◻ ◻

आवृत्ति पहिली
शके १८९०; सन १९६९

◻ ◻

कुमार साहित्य माला :
जीवनदर्शन

◻ ◻

मूल्य रु. १–५०

◻ ◻

प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ
बोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग
मुंबई २

◻ ◻

य. गो. जोशी, बी. ए.
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव पेठ
पुणें २

" माझ्या दृष्टीनें सत्य आणि प्रेम
म्हणजेच परमेश्वर."

—म. गांधी

## दर्शनापूर्वी

‘ दर्शन ’ याला आपल्या संस्कृतींत विशेष अर्थ आहे. पवित्र, आदरणीय व्यक्तीसमोर किंवा मूर्तीसमोर जाऊन, तिच्याजवळ उभें राहून श्रद्धायुक्त भावनेनें तिला नमस्कार करून, तिला जवळून पहावयाचें याचा अर्थ दर्शन. पण यासाठीं ‘ पहावयाचें ’ हा शब्दहि पुरेसा नाहीं; जर त्या व्यक्तीच्या किंवा मूर्तीच्या ठिकाणचे श्रेष्ठ सद्गुण आपल्या स्वतःच्या ठिकाणीं अंशतः तरी उतरावेत, त्या व्यक्ती-मूर्तीच्या समीप जाण्यामुळें ते थोडेतरी आपल्यांत संक्रमित व्हावेत, अशी या ‘ दर्शनां ’त अपेक्षा असते.

याशिवाय ‘ दर्शन ’ याचा दुसरा एक अर्थ तत्त्वज्ञान असाहि आहे. त्याहि दृष्टीनें त्या व्यक्तीचें किंवा मूर्तीचें जें विशिष्ट तत्त्वज्ञान असेल, विशिष्ट जीवनप्रणालीप्रमाणें तिनें आपलें जीवन घडविलें असेल, ज्या तत्त्वांचा भव्य-दिव्य व्यवहार त्यांच्या जीवनांत त्यांनीं प्रत्यक्ष घडविला असेल त्या तत्त्वप्रणालीचाहि परिणाम दर्शन घेणाऱ्या माणसावर होतच असतो.

कुमार साहित्य मालेंतून अशी ही एक जीवनदर्शन पुस्तकमाला आम्ही सुरू करीत असून, त्यांतील ‘ गांधीजी ’ हें पहिलें पुस्तक आहे. याचे लेखक श्री. भाऊ धर्माधिकारी हे समग्र गांधीवाङ्मयाचे एक संपादक आहेत, यावरून या चरित्रलेखनाविषयींचा त्यांचा अधिकार ध्यानीं येईल.

या मालेंतून अशा अनेक थोर व्यक्तींचें जीवनदर्शन घडविण्याची योजना आहे. त्यांत विश्वेश्वरअय्यांसारखीं विशिष्ट क्षेत्रांत नांवाजलेलीं थोर माणसें आहेत, तशीं स्वामी विवेकानंदांसारख्या जगद्वंद्य विभूतिहि आहेत. मात्र हीं संपूर्ण चरित्रें नसून त्यांच्या चरित्रांतील ठळक महत्त्वाच्या संस्मरणीय, व्यक्तिवैशिष्ट्यदर्शक घटना यांत सांगितल्या आहेत.

अर्थातच त्या त्या व्यक्तींच्या जीवनाचें हें समग्र दर्शन नव्हे; तर लेखकाला त्या व्यक्तीच्या जीवनांतील जें अंग महत्त्वाचें वाटलें त्यावरच अधिक प्रकाश टाकून त्यानें रंगविलेलें व्यक्तिचित्र आहे, हें ध्यानांत घेतलें पाहिजे. गांधी-जन्मशताब्दीनिमित्त प्रथम या वर्षी गांधीजींचें जीवनदर्शन घडविणें सयुक्तिक वाटलें, म्हणून हें पहिलें जीवनदर्शन या वेळीं प्रसिद्ध होत आहे.

म... ग्रंथालय शाखा.
अनु... ७००७०. दि. ...
क्रमांक ३७००. नोंद दि. २०...

## हितगुज

मित्रांनो,

माणसानें एकच सद्गुण कां होईना, आपल्या आचरणांत प्रामाणिकपणें आणायचा निश्चय केला आणि तो कोणत्याहि परिस्थितींत पाळला तर इतर सद्गुण आपोआप त्याच्यांत उतरूं लागतात. आणि सत्य हें तर सर्व सद्गुणांचें मूळ आहे.

मोहनदास गांधी या मुलानें सत्य सोडायचें नाहीं असा निश्चय केला आणि तो आयुष्यभर पाळला. सत्याला धरून वागायचें म्हणजे फक्त खरें बोलायचें एवढेंच रहात नाहीं. प्रत्येक गोष्टींत, प्रत्येक बाबतींत सत्य कोणतें तें शोधावें लागतें आणि त्या सत्याला चिकटून रहावें लागतें. तें सत्य शोधतांना आपली दृष्टि, आपलें मत कित्येक वेळां माया-ममतेनें, कित्येक वेळां स्वार्थानें, कित्येक वेळा भीतीनें झाकाळून जातें. आपल्याला मोह पडतो. कित्येक वेळां त्या सत्याला धरून वागायचें म्हटलें म्हणजे स्वार्थ टाकावा लागतो, आपल्या जिवलग माणसांना सुद्धां सोडण्याचा प्रसंग येतो, जीव धोक्यांत घालावा लागतो. पण हें सर्व करायला जो तयार होतो, या सर्व गोष्टींपेक्षां सत्यच श्रेष्ठ आहे असें जो श्रद्धेनें मानतो, त्याकरितां आपल्या इच्छा-वासना आवरतो, राग-द्वेष-लोभ ताब्यांत ठेवतो, आपला अहंपणा – शहाणपणाची घमेंड टाकून देतो आणि सर्वांपुढें नम्र होतो, त्याच्या अंगीं जगाला मुठींत ठेवण्याची शक्ति येते. त्याच्या तोंडून ईश्वर बोलूं लागतो आणि त्याच्या हातून मानवसमाज उद्धरला जातो.

मोहनदास गांधी हा एक काठेवाडी मुलगा आपल्या सत्यनिष्ठेच्या बळावर आणि सेवेच्या अपरंपार सामर्थ्यावर 'महात्मा गांधी' झाला. तो आज दिवंगत झाला असला तरी जग आज आपलें दुरित घालविण्यासाठीं त्यानें दाखविलेल्या मार्गाकडे खेचलें जात आहे. याचें कारण त्यानें सत्यरूपी परमेश्वराची अहिंसेच्या म्हणजे सर्वांवर समान प्रेम करण्याच्या साधनानें केलेली उपासना.

सत्याची इतकी एकनिष्ठ उपासना अलिकडच्या काळांत कोणी केलेली आढळत नाहीं. अशा सत्य-उपासकाच्या, किंवा त्यांच्या शब्दांत 'सत्याग्रह्या'च्या, जीवनांत असे कितीतरी लहानमोठे प्रसंग येऊन गेले कीं जे आपल्यासारख्यांना मार्गदर्शक होतील. त्यांनीं तर त्याकरितां 'सत्याचे प्रयोग' म्हणून आपलें आत्मचरित्रच लिहून ठेवलें आहे. तें मुलांनीं-तरुणांनीं, सर्व स्त्री-पुरुषांनीं ध्यानपूर्वक वाचण्याजोगें आहे. तें वाचून तुमच्यांतल्या एखाद्या मुलानेंहि जर ठरविलें कीं कांहीं होवो, आपण सुद्धां सत्याला इमानदार राहण्याचा असा प्रयोग करूं, तर त्याला सुद्धां जीवनांत मोठे चमत्कार आढळून येतील. त्याचें स्वतःचें जीवन उन्नत होईलच, पण आजूबाजूच्या लोकांचें जीवन सुद्धां तो उन्नत करील.

या छोट्याशा पुस्तकांत गांधीजींच्या जीवनांतले लहानपणापासूनचे फार थोडे निवडक असे प्रसंग दिले आहेत. त्यांत तुम्हांला गोडी उत्पन्न झाली तर तुम्ही त्यांचे 'सत्याचे प्रयोग' हें पुस्तक वाचाल. हें छोटें पुस्तक तुम्हांला सत्याचे पुजारी व्हायला मदत करो, एवढीच अपेक्षा करतों.

तुमचा

**भाऊ धर्माधिकारी**

## गांधीजी : जीवनदर्शन


Φ दर्शनापूर्वी
Φ हितगुज
१. गुरुजींचा शेरा
२. वडिलांची क्षमा
३. ' तर मग मला मरूं द्या !
४. खरी वकिली
५. बॅरिस्टरचे ' भाई ' बनले
६. तीनशें पौंडांचा चेक
७. किनाऱ्याजवळचें तुफान
८. येरवित्तधन मृत्तिकेसमान
९. धर्मश्रद्धेची कसोटी
१०. सत्याग्रहाचें सामर्थ्य
११. अलौकिक गुरु-शिष्य
१२. निर्भय गांधी, निर्भय जनता
१३. भक्ताचा पाठिराखा राम
१४. नंगा फकीर
१५. आंतला आवाज
१६. हृदयाची भूक
१७. संतांचें भांडवल
धांवता जीवनपट.


□ □ □

... ग्रंथालय शाखा.
अनु...
क्रमांक ........ दि ........

# गुरुजींचा शेरा

: १ :

इन्स्पेक्टरसाहेब शाळा तपासायला आले होते. इंग्रजी दुसरीच्या वर्गांत ते मुलांची इंग्रजीची चांचणी परीक्षा घेत होते. मुलें धडधडत्या छातीनं पुढ्यांत पडलेल्या कागदाकडे डोळे लावून आणि साहेबांच्या शब्दाकडे कान लावून आपापले टाक सरसावून बसलीं होतीं. वर्गाचे मास्तर हळूहळू बाकांमधून फिरत होते आणि चोरून मुलांच्या कागदावर दृष्टि टाकीत होते.

साहेबांचा शब्द ऐकूं आला – ' ए टी. ' मुलें खालीं मान घालून लिहूं लागलीं. कुणी चटकन् लिहिलें, कुणी दबकत दबकत लिहिलें. इंग्रजी शब्द तो, गुजरातीसारखा थोडाच लिहायचा ! सारीं अक्षरें एकापुढें एक जोडून लिहायचीं. ना काना, ना मात्रा. प्रत्येक शब्दाचीं बरोबर अक्षरें कोणतीं—म्हणजे त्या शब्दाचें स्पेलिंग काय—तें आठवलें तर पाहिजे ?

लगेच दुसरा शब्द आला. ' दि सन्. ' मास्तरांचें मन थोडें थोडें होऊं लागलें. मुलें बरोबर लिहितात कीं चुका करतात ! सगळींच्या सगळीं मुलें पास झालीं तर ती आपली शिफारसच ठरेल. पण जर का तीं चुकलीं तर आपल्याविषयीं शेरा वाईट मिळणारच; पण शाळेचें नांवहि बद्दू होणार. त्यांचे पाय बाकांच्या रांगांमधून फिरत होते आणि डोळे बाकांवरच्या कागदांवरून.

' ए केटल् '– तिसरा शब्द. याच वेळीं मास्तरांची दृष्टि त्यांच्या उजव्य हाताकडील बाकावर बसलेल्या पहिल्या मुलाच्या कागदाकडे गेली. या शब्दाचें स्पेलिंग त्यानें चुकवून ठेवलें होतें. मास्तरांनीं उभ्या उभ्या आपल्या बुटाच्या टोकानें त्याच्या पायाला डिवचलें. मुलाला वाटलें, आपला पाय मास्तरांच्या पायाला लागला, म्हणून संकोचानें त्यानें आपला पाय जवळ घेतला. तरी

मास्तरांचा बूट पुनः पुनः त्याच्या पायाला टोचूं लागला. त्यानें वर मास्तरांकडे पाहिलें. मास्तरांनीं डोळ्यांच्या खुणेनें शेजारी मुलाच्या पेपराकडे पाहून तसे लिही असें सुचविलें आणि ते लगेच पुढें सरले. त्या मुलाला या खुणेचा कांहीं बोध झाला नाहीं. कुणी कुणाचें चोरून पाहून लिहूं नये म्हणून तर मास्तर सर्वांच्या मधून फिरतात अशी त्या भाबड्याची समजूत! त्याला तो शब्द पुरा करतां आला नाहीं.

साहेबांनीं आणखी दोन शब्द घातले आणि ती परीक्षा संपविली.

साहेब गेले आणि मास्तरांनीं सर्वांचे शब्द तपासून पाहिले. सर्वांनीं सर्व शब्द बिनचूक लिहिले होते, फक्त या भाबड्या मुलाचा 'केटल्' हाच शब्द तेवढा चुकला होता.

मास्तर त्याला म्हणाले, "तरी तुला मीं खूण करून शब्द कसा लिहायचा तें सांगितलं होतं ना?"

मुलानं बिचकत विचारलें, "कधीं, सर?"

मास्तर म्हणाले, "मग तुझ्या पायाला डिवचलं होतं कशाला, मूर्खा! केशवलालच्या पेपरावरचं बघून लिही असं तुला मीं सुचवलं तेवढंहि तुला कळलं नाहीं? बावळट!"

मास्तरांच्या शब्दांनीं या 'बावळट' मुलाच्या अंगाचें लाजेनें पाणी पाणी झालें. पण तरीहि आपण दुसऱ्याचें पाहून त्याची नक्कल करायची असें मास्तर सांगतील असें त्याला वाटेना आणि तें त्याला पटेना. तो हिरमुसला होऊन घरीं परत आला. या बावळट मुलाचें नांव होतें मोहनदास करमचंद गांधी!

मोहनदासाच्या मनांत हा खोटेपणा रुजेचना. कारण त्याच्या मनाचें वळणच मुळापासून तसलें नव्हतें. खऱ्याकडे त्याची मनापासून प्रवृत्ति. खोट्याचा त्याला तिटकारा होता.

वडील मंडळींच्या बरोबर एकदां 'राजा हरिश्चन्द्र' हें नाटक बघायला तो गेला होता. आपलें स्वप्नांतलें वचन खरें करण्याकरितां हरिश्चन्द्रानें किती हाल सोसले तें त्यानें त्या नाटकांत पाहिलें होतें. हरिश्चन्द्राची बायको तारामती आणि लहान मुलगा रोहिदाससुद्धां गुलामाच्या बाजारांत विकले गेले; आणि बापाची, आईची आणि मुलाची क्रूरपणें ताटातूट झाली तरी बापाचा शब्द खरा करण्याकरितां लहान रोहिदाससुद्धां या सगळ्या हालअपेष्टांना धैर्यानें तोंड देतो. ती

ताटातूट पाहतांना मोहनदासाच्या पोटांत तटतट तुटत होतें, त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या. पण त्याला हरिश्चन्द्राबद्दल, तारामतीबद्दल आणि रोहिदासाबद्दल मनांतून अभिमानसुद्धां वाटत होता. वेळ आलीतर आपण सुद्धां खऱ्याकरितां असें सगळें सहन करूं असें त्याला वाटत होतें. असा मोहनदास परीक्षेंत शब्द आला नाहीं म्हणून दुसऱ्याचें चोरून पाहून कसें लिहिणार ?

पण मोहनदास तसा वावळट नव्हता. अभ्यासांत सुद्धां तो ढ नव्हता. पण त्याला स्वतःच्या बुद्धीबद्दल खात्री नव्हती, त्यामुळें तो नेहमीं संकोची, लाजाळू असे. 'आपली फजीती झाली तर ?' अशी जणूं नेहमीं त्याला भीति वाटायची. म्हणून शाळेलासुद्धां तो घंटेच्या टोलाला हजर व्हायचा आणि शाळा सुटली रे सुटली कीं लगेच घरीं परत फिरायचा. मुलांत तो फारसा मिसळायचा नाहीं.

● ● ●

मराठी ... नालय शाखा.
..............
दि..............

## वडिलांची क्षमा : २ :

" मनू, मनू आहे का रे ? "

कबाबापांनी साद घातली. मनू धांवत हजर झाला.

" मला दांतण करायचं आहे. पाणी आणून दे."

" हां, देतोंच. " मनूनें धांवत जाऊन गरम पाणी आणलें आणि आजारी वडिलांना तोंड धुवायला मदत केली. त्यांना आंघोळ घातली, अंग पुसलें, कपडे बदलले, वैद्यानें सांगितलेला औषधाचा घोटा तयार केला आणि आणून दिला. त्यांना खाऊं घातलें आणि मग तो आपल्या अभ्यासाला लागला.

" मनू ! " पुनः हांक.

" आलों " म्हणत मनू हजर झाला.

" माझे पाय जरा दाब बरं. " मनूनें भक्तिपूर्वक वडिलांचे पाय दाबायला सुरुवात केली.

मनू म्हणजे मोहनदास आणि कबाबापा म्हणजे त्याचे वडील करमचंद. वडिलांना मनूशिवाय आणि मनूला वडिलांशिवाय करमत नसे. अखंड अष्टौप्रहर जरी वडिलांची सेवा करावी लागली तरी मोहनदासाला कंटाळा यायचा नाहीं; आणि करमचंदांना 'मनू'शिवाय दुसरें कोणी चालायचें नाहीं. ते त्याला लाडिकपणानें 'मनू' म्हणून बोलावीत. आपल्या या मुलावर त्यांचें जसें प्रेम तशीच अनुपम श्रद्धाहि होती. हा मुलगा घराण्याचें नांव काढील असें त्यांना वाटायचें. कुणी त्यानां एकदां विचारलें,

" काका, तुमच्यानंतर तुमची प्रतिष्ठा कोण सांभाळील ? "

" हा मनू. मनू कुळाचं नांव काढील. "

बापाची वाणी किती खरी झाली तें आपण आज पहात आहोंत.

अशा गुणी मुलाकडे साहजिकच सच्छील पित्याचें फार लक्ष असणारच. त्याचें वर्तन थोडेंसुद्धां बिघडूं नये अशी त्यांना काळजी असणार.

एकदां नेहमींप्रमाणें संध्याकाळच्या वेळेला मोहनदास वडिलांचे पाय दाबत बसला होता. पण आज त्याचें मन चाललेल्या कामाकडे नव्हतें. तें घुटमळत होतें. या कामांतून लवकर मोकळीक मिळाली तर बरें असें त्याला वाटत होतें.

शेवटीं त्यानें मनाचा हिय्या केला आणि तो हळूच म्हणाला " बापू . . ."

पण बापूंनीं हुंकार दिला नाहीं. त्यांना अगोदरच कळलें होतें कीं आज मुलाचें चित्त नेहमींसारखें थाऱ्यावर नाहीं.

मोहनदासानें पुनः म्हटलें, " बापू , . . . आज एक चांगलं नाटक आहे—"

तरी उत्तर नाहीं. मोहनदासानें जाणलें कीं वडिलांची मर्जी नाहीं. पण मोह सुटतो थोडाच ! पुनः तो बोलला, " आज बापू एक चांगलं नाटक आहे, बघायला जाऊं ? "

वडिलांनीं पडल्या पडल्या डोळे न उघडतांच कसें बसें उत्तर दिलें, " ज . . . जा. " शब्द 'जा' असा होता पण भाव 'जाऊं नको' असाच होता. पण मोहनदासानें तिकडे दुर्लक्ष केलें. आणि पडत्या फळाची आज्ञा समजून तो नाटकाला गेला.

तिसरी घंटा झाली आणि नाटकाचा पडदा वर उचलला. मोहनदासाचें चित्त डोळ्यांत येऊन बसलें होतें. इतक्यांत घराकडचा माणूस शोधत शोधत आला अन् म्हणाला, " तिकडं बापू रडत डोकं आपटून घेत आहेत..." मोहनदास तसाच तडक निघाला. घरीं जाऊन त्यानें वडिलांची माफी मागितली. ते त्याच्यावर रागावले नाहींत किंवा त्याला टाकूनहि बोलले नाहींत. गांधी म्हणतात, " त्या दिवसापासून ते हयात असेपर्यंत तरी मीं कधीं नाटक बघितलं नाहीं. "

अशा या मुलानें — सच्चरित वैष्णव बापाच्या लाडक्या मुलानें — वडिलांना चोरून मांस खायला सुरुवात केली ! कशाकरितां ? त्याला आवडत होतें म्हणून नव्हे, तर धष्टपुष्ट होऊन इंग्रजाला या देशांतून हाकून लावायचें याकरितां. त्याच्याहून थोरला भाऊ करसनदास आणि त्याचा एक अगदीं जीवश्चकंठश्च मित्र शेख मेहताब या दोघांचीं शरीरें चांगलीं मजबूत होतीं; मोहनदासाचें किडकिडीत होतें. त्यांच्या मसलतींत नेहमीं शरीर बळकट करण्याकरितां मांस खाल्लें पाहिजे

अशा गोष्टी व्हायच्या. मोहनदासाला आपल्या दुबळ्या शरीराची फार खंत वाटायची. इंग्रजांना जर या देशांतून घालवून द्यायचें तर आपलें शरीर त्यांना पुरून उरण्यासारखें तरी असलें पाहिजे ! नर्मद कवीनें तर एका कवितेंत म्हटलेंच आहे कीं इंग्रज हिंदी लोकांवर राज्य करतो तो त्याचें शरीर हिंदी माणसापेक्षां चांगलें धिप्पाड असतें म्हणून. आपण आपलें शरीर चांगलें बनविलें पाहिजे. पण त्यासाठीं मांस खाल्लें पाहिजे असें हा मेहताब म्हणतो. आपण वैष्णव, आपल्या घरांत मांसाचें नांवसुद्धां घेत नाहींत. आपण मांस खाल्लें तर घरांत काय हलकल्लोळ होईल ! पण शेख तर म्हणतो कीं, करसनभाईसुद्धां मांस खातो म्हणून. चोरून खाल्लें म्हणजे झालें.

बळवान् होण्याच्या धुंदींत मोहनदास धर्म विसरला, इतकेंच नव्हे, तर आई-वडिलांशीं त्यानें खोटेपणा आरंभला. मांस त्याला आवडत तर मुळींच नव्हतें. पण जें एकदां कर्तव्य म्हणून ठरविलें तें कितीहि नावडतें असलें तरी करायचें या त्याच्या उपजत स्वभावाप्रमाणें त्यानें मांस पचनीं पाडण्याचा प्रयत्न केला. त्याकरितां जेवतांना त्याला आईला ‘ भूक नाहीं म्हणून अन्न जात नाहीं ’ असें खोटेंहि सांगावें लागलें. खोटें सांगावें लागलें एवढेंच नव्हे, तर चोरीहि करावी लागली. भावाच्या हातांतल्या सोन्याच्या कड्याचा तुकडा तोडून काढून तो विकून मांसाहाराकरितां झालेलें देणें त्यानें देऊन टाकलें.

मोहनदासाचें मन आतां त्याला खाऊं लागलें होतें. आपण चाललों आहोंत कुणीकडे ? आपल्या पूज्य मातेला आणि पित्याला आपण फसवीत आहोंत या विचारानें त्याला रात्रीं झोप येईना. त्यानें मांस पुनः कधीं खायचें नाहीं असा निश्चय केला. शेखनें वरचेवर आग्रह करून त्याला चोरट्या ठिकाणीं नेलें तरी तो मांसाला शिवला नाहीं. पण कडें चोरल्याचा डंख त्याच्या मनाला एकसारखा बसत होता. त्या पापाची मळमळ त्याच्या अंतःकरणाला सतावीत होती. हें पाप कसें धुऊन काढतां येईल ? त्याला चैन पडेना. मोहनदासाचें या वेळीं म्हणजे वयाच्या तेराव्या वर्षी त्याच्या वडिलांनीं लग्न करून टाकलें होतें. बायको कस्तुर-बाई नवऱ्याची बेचैनी जाणून त्याला कारण विचारी, पण तें सांगण्याची त्याला हिंमत होत नव्हती. बायकोपुढें आपली शरम उघडी करायची ?

शेवटीं त्यानें ठरविलें कीं वडिलांच्यापुढें जाऊन आपल्या चोरीची कबुली द्यायची. अरे बापरे ! मग काय होईल ? वडील मारतील अशी भीति मोहनदासाला

वाटली नाहीं, पण ते दुःखानें स्वतःलाच भयंकर दुखापत करून घेतील. काय करून घेतील अन् काय नाहीं, सांगतां येणार नाहीं, असें भय त्याला वाटलें. पण मनाची वाढती बेचैनी घालवायला कबुलीशिवाय दुसरा मार्ग नव्हता. त्यानें तोच पत्करायचें ठरविलें. तथापि वडिलांपुढें तोंडानें बोलून आपला अपराध प्रकट करण्याची हिंमत त्याला होईना. त्यानें शेवटीं एक पत्र लिहून तयार केलें. त्यांत आपल्या सर्व चुकीचा कबुलीजबाब दिला : ‘ मला माफी करा, पुनः असलें कृत्य माझ्या हातून होणार नाहीं ’ अशी हमी दिली, आणि आपल्या जिवाला बरेंवाईट करून घेऊं नका अशी शेवटीं विनवणी केली.

तें पत्र घेऊन वडिलांच्या जवळ कोणी नाहीं असें बघून त्यानें तें भीतभीत त्यांच्या हातीं दिलें आणि म्हटलें, “ वाचा. ”

करमचंद खाटेवर पडले होते ते उठून बसले. त्यांनीं पत्राची घडी उलगडली आणि तें पत्र पहिल्यापासून शेवटपर्यंत वाचलें.

मोहनदास खालीं मान घालून बसला होता. त्याच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला होता. आतां पुढें काय होणार या धास्तीनें त्याचा जीव गोळा झाला होता.

कबाबापांनीं पत्र पूर्ण वाचलें. त्यांनीं डोळे मिटले आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा सुरु झाल्या. मोहनदासालाहि रडूं आवरेना. तो ओक्साबोक्शीं रडला. वडिलांच्या आणि स्वतःच्या दोन्ही आसवांनीं त्याचें मन धुऊन निघालें, निर्मळ — स्वच्छ झालें, आणि शांत झालें. वडिलांच्या क्षमेचा, सहनशक्तीचा अतिशय मोठा परिणाम त्याच्या मनावर झाला. तो जन्मभर पुसला गेला नाहीं.

• • •

## " तर मग मला मरूं द्या ! " : ३ :

" भाबी, आपल्या मोहनदासाला तुम्ही विलायतेला पाठवा. त्याला बॅरिस्टर होऊन येऊं दे. काय मोहनदास, जाशील का विलायतेला ? "

मोहनदासाला तर विलायतेचीं स्वप्नेंच पडत होतीं. कॉलेजांत त्याला अभ्यास जमत नव्हता. नापास होण्याची भीति वाटत होती. विलायतेला अभ्यास याच्यापेक्षां सोपा असतो असें त्यानें ऐकलें होतें. शिवाय त्याला डॉक्टर व्हायची मनापासून खूप इच्छा होती.

" हो, जोशीजी, मी डॉक्टरीचा कोर्स घ्यावा म्हणतों. "

" छे: छे: डॉक्टरी बिक्टरी आपल्याला नको. त्यांत कापाकापी करायला लागते. आपण वैष्णव, आपल्या बापूंना तें आवडत नव्हतं. " मोहनदासाचा थोरला भाऊ लक्ष्मीदास म्हणाला. करमचंदबापांच्या पाठीमागें तोच आतां घरचा कर्ता पुरुष झाला होता.

" हें पहा मोहनदास, तुमच्या घराण्यांत तुझ्या वडिलांनीं, आजोबांनीं राजांची प्रधानकी केली. कबाबापांच्या मागें हा घराण्याचा लौकिक वाढवायचा अन् एवढ्या मोठ्या कुटुंबाचा खर्च चालवायाचा तर विलायतेला जाऊन तूं बॅरिस्टर होऊन यावंस असं मला वाटतं. भाबी, तुमची संमति मिळाली तर मोहनदास तीन वर्षांत बॅरिस्टर होऊन येईल. इथंच राहिला तर वकील व्हायला त्याला पांच सहा वर्षं लागतील. " मावजी दवे नांवाचे करमचंद गांधींचे एक अगदीं निकटचे स्नेही पुतळीबाईंना सांगत होते.

पण इतक्या लांब अगदीं परक्या देशांत लहान मोहनदासाला पाठविण्याचें धारिष्ट्य त्याच्या आईला होईना. मोहनदासानें हट्टच धरला तेव्हां त्यांच्या कुटुंबाचे

पूर्वाश्रमांत स्नेही असलेल्या आणि आतां जैन साधु बनलेल्या वेचरदास नांवाच्या विश्वासाच्या हितचिंतकाचा पुतळीबाईनीं सल्ला घेतला. वेचरदासांनीं मोहनदासांकडून त्याच्या आईसमक्ष तीन शपथा घेतल्या. 'मी दारू पिणार नाहीं, मांस खाणार नाहीं आणि परस्त्रीकडे वांकड्या नजरेनें पहाणार नाहीं' आईनें दुःखी अंतःकरणानें त्याला परवानगी दिली.

मोहनदास विलायतेंत पोंचला खरा, पण तेथें त्याच्या हालांना सुरुवात झाली. खायचें काय हा मोठा प्रश्न त्याच्यापुढे उभा राहिला. कोणत्याहि हॉटेलांत, खाणावळींत जेवण घ्यायचें म्हटलें तर तें मांसाशिवाय मिळायचें नाहीं. ही अडचण तशी तर बोटींत पाय ठेवल्यापासूनच त्याला भासूं लागली होती. परंतु प्रवासांत त्यानें कसें बसें निभावून नेलें. पश्चिमेकडील थंडींत माणसाचें दारू-मांसाशिवाय चालतच नाहीं असें बरोबरचे सर्व लोक त्याला परोपरीनें सांगत होते. तथापि आईला दिलेलें वचन त्यानें मनावर कोरून ठेवलें होतें. त्याला अनुभव असा आला, कीं लोक समजतात किंवा सांगतात तसा पश्चिमेकडील प्रदेशांत प्रवेश केला तरी दारू-मास न घेतांसुद्धां माणसाला कांहीं धोका पोंचत नाहीं. 'तिकडे इतकी थंडी हिंवाळ्यात असते कीं मांस न खाल्लें तर माणसाला क्षय होतो. बाबारे असाच एक गृहस्थ क्षय लागून मेला' असेंहि सांगणारे मोहनदासाला भेटले.

विलायतेंत त्याचें पोटच भरेना अशी स्थिति झाली. कारण, नुसत्या चहा-ब्रेडसारख्या पदार्थांवर किती दिवस काढायचे ? शाकाहार देणाऱ्या खाणावळी त्या काळीं इंग्लंडांत होत्या पण फारच कमी व अप्रसिद्ध होत्या. त्या मोहनदासाला प्रथम सांपडल्याच नाहींत.

अशा रीतीनें मोहनदासाची उपासमार होऊं लागली आणि तो अशक्त झाला. एका डॉक्टरला त्यानें आपली प्रकृति दाखविली. त्यानें सांगितलें, " तुला तसा कांहीं आजार नाहीं; पण तुझ्या अंगांत रक्ताचा पुरवठा पुरेसा नाहीं—तूं मांस किंवा मांसाचे पदार्थ खाल्लेस तरच तुझा इथं निभाव लागेल. नाही तर उपासमार होऊन झिजून मरशील. "

डॉक्टरांच्या या अभिप्रायानें मोहनदास घाबरला खरा. या परक्या मुलखांत, आप्तेष्ट जवळचें कोणी नसतांना, आपली काळजी वाहणारी माणसें स्वदेशांत असतांना उपासमारीनें इकडे मरायचें कीं डॉक्टर म्हणतात तसा शरीरपोषणाकरितां मांसाहार करायचा ?

मोहनदास दुसऱ्या दिवशीं पुनः त्या डॉक्टरांकडे गेला. ते भले गृहस्थ होते, आणि मोहनदासाविषयीं त्यांनीं बरीच आस्था दाखविली होती.

" डॉक्टर, दुसरा कांहीं उपाय नाहीं काय ? "

" नाहीं; मुला, नाहीं. इथं तुझ्या पोटांत मांसल पदार्थ गेल्याशिवाय तुला शक्ति येणारच नाहीं. हें मी खरोखर मनापासून तुला सांगतों. आमचं शास्त्रच हें बोलत आहे. पण तुला पंचाईत कसली पडली आहे तें तरी सांग. "

मोहनदासानें आपण आईपुढें घेतलेल्या शपथेची हकीकत डॉक्टरांना सांगितली. डॉक्टरांना त्याचें कौतुक वाटलें खरें, पण तो मूर्खपणाहि वाटला आणि दुसरा इलाज त्यांना माहीत नव्हता. ते म्हणाले,

" मि. गांधी, मी म्हणतों त्याचा पुनः विचार करा. "

मोहनदासानें खूप खूप विचार केला. आपलें शरीर दुबळें होत चाललेलें त्याला जाणवतच होतें. पोटांतली भूक शमत नव्हती. याच डॉक्टरांनीं नव्हे, तर दुसऱ्याहि डॉक्टरांनीं तेंच त्याला सांगितलें होतें. त्यांच्यापाशीं दुसरा उपायच नव्हता. मग काय करायचें ?

त्या प्रेमळ डॉक्टरांच्या घरीं दुसऱ्या दिवशीं पुनः तो गेला. ते म्हणाले, " बैस बाळ, आतां मी दहा मिनिटांत गरम गरम बीफ टी घेऊन येतों. " आणि ते आंत निघूनहि गेले. मोहनदास चुळबुळत बसून राहिला.

सांगितल्याप्रमाणें दहा मिनिटांत डॉक्टर आपल्या हातीं बीफ टी ( मांसा ) च्या साराचा पेला घेऊन बाहेर आले आणि तो त्याच्यापुढें करून हंसत हंसत म्हणाले, " हा घे आणि चिंतामुक्त हो एकदांचा. "

मोहनदासानें त्या पेल्याकडे पाहिलें आणि आपली स्थिर दृष्टि डॉक्टरांच्या डोळ्यांना भिडवून त्यांना संथपणें विचारलें,

" डॉक्टर, मला पुनः एकदां सांगा, मांस माझ्या पोटांत गेलं नाहीं तर माझी प्रकृति सुधारणार नाहीं का ? "

" नाहीं; मि. गांधी, हिंदुस्थानांत तुम्ही मांस खाल्लें नाहींत तर एक वेळ चालेल. या थंड मुलुखांत तुमच्या शरीरांत पुरेशी उष्णता आणि ताकद आणाया मांसाशिवाय दुसरं कोणतंहि अन्न उपयोगी पडणार नाहीं. "

" मांस मी घेतलं नाहीं तर मी वांचणार नाहीं अशी, डॉक्टर, तुमची खात्री आहे का ? "

" होय माझी तशी खात्री आहे अन् कोणीहि दुसरा डॉक्टर तुम्हांला याखेरीज कांहीं सांगणार नाहीं; म्हणून म्हणतो कीं हा गरम गरम बी फटी घेऊन तुम्ही ताकद मिळवायला सुरुवात करा " आणि त्यांनीं पेला पुढें केला. मोहनदास उठून उभा राहिला आणि म्हणाला,

" तर मग, डॉक्टर, मला मरूं द्या ! ईश्वराची तशीच इच्छा असेल तर मी अशा रीतीनं मरायला तयार आहें. पण आईपुढें घेतलेल्या शपथेपासून ढळणं मला मरणाहून भयंकर वाटतं ! थँक्यू डॉक्टर. "

आणि मोहनदास आल्या पावलीं निघून गेला.

• • •

मराठी ... वाचनालय शाखा,
अनुक्रम ... ................
क्रमांक...... दि...............

# खरी वकिली : :४

गांधी जो दावा चालविण्यास बॅरिस्टरांना मदत करण्यासाठीं आफ्रिकेला गेले होते तो दावा जमाखर्चाच्या भानगडीची गुंतागुंत असलेला असा होता. या गुंत्यांत शिरून त्यांतले बारकावे शोधून खरें कोणतें, खोटें कोणतें याचा तलास लावणें, दादा अब्दुल्ला यांची बाजू तयार करणें व तिच्या पुष्टीसाठीं पुरावे वगैरे गोळा करणें आणि ती सर्व बाजू गोऱ्या बॅरिस्टरला समजावून देणें या कामाची जबाबदारी गांधींच्यावर सोंपविण्यांत आली होती.

गांधींनीं या दाव्यांत पूर्ण लक्ष घातलें. सर्व कागदपत्र वाचून-तपासून काढले. अशिलाकडून तोंडी माहितीहि त्यांनी समजून घेतली. कायदे वाचून काढले. गांधी या दाव्याशीं इतके तन्मय होऊन गेले कीं कदाचित् वादी-प्रतिवादींनासुद्धां गांधींच्याइतकी या दाव्याची माहिती नसेल.

या दाव्याचा अभ्यास करतांना गांधींना हें समजून आलें कीं, दाव्याची तयारी करतांना जें जें जसें घडलें त्याला, म्हणजे सत्यस्थितीला, फार महत्त्व आहे. कायदा खरोखरच सत्यस्थितीच्या मदतीला येतो. आपल्या अशिलाची बाजू सत्यस्थितीच्या दृष्टीनें भक्कम आहे असें गांधींना आढळून आलें.

आतां हें बॅरिस्टरांना आणि सॉलिसिटरांना समजावून देऊन त्यांना हवे असलेले पुरावे काढून द्यायचे, ते घेऊन आपले युक्तिवाद कोर्टापुढें मांडायचे, आणि कोर्टानें मग वादीच्या आणि प्रतिवादीच्या पुढें आलेल्या पुराव्यांची आणि युक्तिवादांची छाननी करून त्यांतून जें आपलें मत बनेल तो निकाल द्यायचा, अशी न्यायदानपद्धति आहे. त्या दृष्टीनें पुरावे जमा करीत असतांना गांधींच्या मनांत आलें, सत्यस्थिति एकच

असते; पण वकील लोक आपापली बाजू रंगविण्याच्या प्रयत्नांत सत्याला बगल देण्याचा प्रयत्न करतात आणि न्यायाधीशाची एक प्रकारें बुद्धि गोंधळून टाकतात. आपापल्या अशिलांना खोट्या आशा देऊन भुलवितात आणि अशा रीतीनें त्यांना लुबाडतात. सत्य बाहेर पडावें, सत्याचा जय व्हावा, दोन्हीहि पक्षकारांचें कल्याण व्हावें, अशी बुद्धि वकील लोक ठेवीत नाहींत, ही किती बरें तिरस्करणीय गोष्ट ! हा दावाच पहा ना, किती वर्षें रेंगाळत आहे आणि त्या पायीं दोन्ही बाजूंचा किती पैसा विनाकारण खर्च होत आहे. त्याऐवजीं जर दोघांनाहि एकत्र आणतां आलें, दोघांच्याहि विश्वासाच्या पंचांकडे हा वाद तोडण्याचें सोपवितां आलें, दोघांनींहि एकमेकांसाठीं देवाण-घेवाण करण्याचें ठरविलें, तर दोन नातेवाईक या दाव्यापायीं आणि खोट्या प्रतिष्ठेपायीं जे रंजीस आले आहेत ते पुनः एक होतील, दोघांचेंहि मानसिक आणि आर्थिक नुकसान व्हायचें थांबेल.

प्रतिवादी तैयब शेठ नांवाचे गृहस्थ होते. ते दादा अब्दुल्ला शेठचे नातेवाईक होते. पण या दाव्यानें दोघांत फार मोठा दुरावा आणला होता. गांधींनीं डरबनला असतांनाच आपले अशील दादा अब्दुल्ला यांना सांगितलें होतें, कीं शक्य तर तडजोडीनेंच हा दावा संपवावा असा प्रयत्न मला करावासा वाटतो. पण दादा अब्दुल्ला घाबरून म्हणाले होते कीं, ‘ छेः छेः, भलत्या भानगडींत पडूं नका. तैयब शेठ फार धूर्त आहेत, ते तुमच्याकडून आपल्या गुप्त गोष्टी काढून घेतील आणि आपल्याला फशीं पाडतील. ’ ,पण गांधींनीं त्या वेळीं दादा अब्दुल्लांची समजूत घातली होती, कीं आपण फक्त त्यांच्याशीं घसट वाढविणार आहोंत, तडजोडीसाठीं त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न करणार आहोंत. आपल्या गोष्टी त्यांना सांगण्याचा प्रश्नच येत नाहीं. आणि त्याप्रमाणें गांधींनीं प्रतिवादी तैयब शेठशींसुद्धां संबंध वाढविला. त्यांना ते पंचांमार्फत तंटा तोडवून घेण्यांत काय फायदे आहेत ते सतत सांगत राहिले.

आणि शेवटीं तैयब शेठ वळले. हा तरुण मनुष्य आपल्या प्रतिपक्षाचा वकील असला तरी आपल्या दोघांच्या कल्याणाचेंच सांगत आहे अशी त्यांची खात्री पटली आणि त्यांनीं पंच-निवाड्याला मान्यता देण्याला कबुली दिली.

झालें. पंच नेमले गेले. गांधींना अतिशय उत्साह आला. पंचांपुढें दावा व्यवस्थितपणें मांडला गेला, आणि निकाल शेवटीं दादा अब्दुल्लांच्या बाजूनें

लागला. निकालानें तैयब शेठकडून दादा अब्दुल्लांचें बरेंच देणें निघालें. या वेळीं दादा अब्दुल्लांनीं जर सूडबुद्धि ठेवून किंवा लोभ धरून सगळें देणें एकदम भागविलें पाहिजे असा आग्रह धरला तर तैयब शेटला दिवाळेंच काढावें लागेल हें गांधींना दिसून आलें. पोरबंदरचे मेमण मरण पत्करतील पण दिवाळखोर म्हणून अप्रतिष्ठा करून घेणार नाहींत. गांधींनीं दादा अब्दुल्लांना उदारता बाळगण्याची विनंति केली आणि ती त्यांनीं मानली. त्यांनीं लांब मुदतीचे हप्ते दिले. ते ठरवून घेतांना सुद्धां गांधींना खूप मेहेनत करावी लागली. पण काम साधलें. झालेल्या निकालानें दोघांचीहि प्रतिष्ठा राहिली, कोर्टकचेरीचा खर्च वांचला, कलह थांबला, दोन घराणीं पुनः एकत्र येण्याचा मार्ग मोकळा झाला.

गांधीजी आपल्या आत्मकथेंत लिहितात : “मी खरी वकिली शिकलों. मनुष्याची चांगली बाजू शोधून काढायला शिकलों. मनुष्याच्या हृदयांत प्रवेश करण्याची कला मला अवगत झाली. वकिलाचें कर्तव्य पक्षकारांत पडलेली फूट सांधणें हें आहे असा माझ्या मनाचा निश्चय झाला. हा धडा माझ्या मनांत इतका पक्का ठसला कीं, पुढच्या वीस वर्षांतील वकिलीचा बराच काळ मीं माझ्या ऑफिसांत बसून शेंकडों दाव्यांच्या तडजोडी करविण्यांतच घालविला. त्यापासून माझें कांहीं नुकसान झालें नाहीं. द्रव्यहानि तर झालीच नाहीं, पण आत्म्याचीहि हानि झाली नाहीं.”

• • •

## बॅरिस्टरचे ' भाई ' बनले

: ९ :

स्वदेशांत धंदा चालवितां येत नाहीं म्हणून आफ्रिकेसारख्या परदेशांत नशिबाची परीक्षा बघण्यासाठीं आलेला हा तरुण बॅरिस्टर दक्षिण आफ्रिकेंत या ना त्या कारणांनीं तेथील गोऱ्यांत आणि हिंदी लोकांत प्रसिद्ध झाला. इतकेंच नव्हे, तर हिंदी व्यापारी मंडळींत व कांहीं गोऱ्यांतसुद्धां प्रिय झाला. गांधींनीं बजाविलेली कामगिरी तशी महत्त्वाची होती. खुद्द गांधींना स्वतःविषयींचा आत्मविश्वास या दाव्यांतील खटपटीमुळें वाढला असें आढळून आलें.

दावा संपला आणि आफ्रिकेंत राहण्याचें प्रयोजनहि संपलें. गांधी डरबनला परतले. तेथून आतां स्वदेशीं परतायच्या तयारीला ते लागले. दादा अब्दुल्लांनीं समारंभपूर्वक त्यांना निरोप देण्याचें ठरविलें. सिडनहॅम येथें त्यांनीं गांधींना मेजवानी दिली. अनेक हिंदी व्यापारी आणि इतर लोक ठिकठिकाणाहून त्याकरितां जमा झाले. गांधींचा दिवसभर तेथें मुक्काम झाला.

वेळ घालविण्यासाठीं म्हणून सहज गांधी वर्तमानपत्रें चाळूं लागले. तेव्हां ' मर्क्युरी ' नांवाच्या एका पत्रांत एका कोपऱ्यांत त्यांना ' इंडियन फ्रँचाईज ' ( हिंदी लोकांचा मताधिकार ) या मथळ्याखालीं कांहीं मजकूर दिसला. तो त्यांनीं वाचला, त्यांत कायदेमंडळाच्या कारभाराचें वृत्त देतांना लिहिलें होतें, कीं नाताळ राज्याच्या विधिमंडळांत हिंदी लोकांना जो मताधिकार आहे तो काढून घेतला जावा, यासंबंधींची विधिमंडळांत चर्चा चालू आहे.

गांधींची जिज्ञासा जागृत झाली. या राजकीय प्रश्नासंबंधींची त्यांना कांहींच माहिती नव्हती. त्यांनीं अब्दुल्ला शेठना त्याबद्दल विचारलें. जमलेल्या मंडळींना कुणाला कांही यासंबंधीं माहिती आहे का विचारलें. पण कोणालाहि कांहीं माहिती नव्हती.

अब्दुल्ला शेठनीं सांगितलें, " मला एक आठवतं खरं. या फ्रॅंचाइजचं असं झालं बघा, आमचा बडा वकील मि. एस्कोंब तुम्हांला माहीतच आहे. त्यांना कौन्सिलांत निवडून येण्यांत त्यांचे सामनेवाले मि. एंजीनिअर यांचा धोका वाटूं लागला. म्हणून ते आमच्याकडे आले न् म्हणाले ' तुम्हां हिंदी लोकांना मताचा अधिकार आहे तो तुम्हांला माहीत आहे का ? तुम्ही तो बजावला पाहिजे. तुम्ही आपलीं मतं मला द्या. ' त्यांच्या सांगण्यावरून आम्हीं आमचीं नांवं मताधिकारपत्रांत नोंदवून घेतलीं न् पुढं निवडणुकींत त्यांना सारीं मतं दिलीं. पुढं काय झालं न् त्या मतांचं काय महत्त्व हें आम्हां व्यापाऱ्यांना काय कळणार ? कायद्याच्या गोष्टी आम्हांला कशा समजणार ? "

गांधी म्हणाले, " कौन्सिलांत कायदे पास होतात आणि तेच लोकांना लागू होतात. हे कायदे जर हिंदी लोकांच्या विरुद्ध झाले समजा, तर तुम्हांला सर्वांना हा देश सोडूनहि जावं लागेल. "

हा संवाद सगळे जमलेले पाहुणे लक्षपूर्वक ऐकत होते. त्यांतले एक गृहस्थ म्हणाले, " मी तुम्हाला खरं सांगू कां गांधीभाई, तुम्ही आतां या बोटीनं हिंदुस्थानला न जातां महिनाभर इथं थांबा, अन् काय करायचं तें आम्हांला सांगा. तुम्ही सांगाल तसं आम्ही करूं. झगडायचं असलं तर झगडूंहि. "

दुसरेहि लोक म्हणाले, " बरोबर, बरोबर, अब्दुल्ला शेठ, तुम्ही गांधीभाईंना ठेवून घ्या. "

पण अब्दुल्ला शेठ पडले व्यवहारी नि धूर्त. ते म्हणाले, " गांधीभाईंना इथं ठेवून घ्यायचं म्हणतां, पण ते आहेत बॅरिस्टर, त्यांच्या फीची काय व्यवस्था करायची ? "

फीचा उल्लेख ऐकून गांधींना बरें वाटलें नाहीं. हें काम सर्वच लोकांच्या हिताचें, सर्व लोकांचें. याकरितां का आपण फी घ्यायची ? हा धंदा का आहे ? त्यांनीं आपलें मत लोकांपुढें बोलून दाखविलें आणि म्हटलें, " मी राहिलों तर लोकांचा एक सेवक म्हणून राहणार. हें काम साऱ्यांनीं मिळून करायचं आहे. तसे जर सगळे मदत करायला तयार असतील तर मी माझी मदत द्यायला तयार आहें. कांहीं पैसा अर्थातच लागेल. पण तो आपण आपआपसांत जमविला पाहिजे. "

सगळे एकदम कबूल झाले. मेजवानीचें रूपांतर सभेंत झालें आणि एक कार्यसमिति नेमण्यांत आली. गांधींनीं एक महिना या कामाकरितां राहाण्याचें ठरविलें, पण– ' योजितो नर एक कांहीं, दैव योजी दूसरें '

● ● ●

## तीनशें पौंडांचा चेक : ६ :

गांधीभाई एक महिन्याकरितां म्हणून नाताळांत राहिले. पण त्यांनीं हातीं घेतलेल्या सार्वजनिक कामाचा व्याप वाढतां वाढतां इतका वाढला, कीं एकामागून एक असे तीस महिने गेले.

या तीस महिन्यांत त्यांनीं नाताळांतल्या सर्व घरांतल्या, सर्व धर्मांच्या हिंदी तरुण-वृद्धांना एकत्र केलें, त्यांना जमातीच्या कामाला लावलें, त्यांच्यांत उत्साह निर्माण केला; सर्व हिंदी लोकांची एक संघटना निर्माण केली आणि तिला नांव दिलें 'नाताळ इंडियन कॉंग्रेस.' या कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालीं सरकारला अर्ज-विनंत्या करण्याचें आणि शिष्टमंडळें पाठविण्याचें काम जसें होत होतें तसेंच जमातींत ऐक्यभाव राखण्याचें, जमातीला स्वच्छ व संस्कारी राहणीचें वळण लावण्याचें आणि हिंदी मुलांना शिक्षण देण्याचें कामहि होत होतें. झगडायचें आणि त्या-बरोबरच आपली स्वतःची म्हणजे व्यक्तीची व जमातीची सुधारणा साधायची हें गांधींच्या कार्यपद्धतीचें वैशिष्ट्य दक्षिण आफ्रिकेंतल्या त्यांच्या सार्वजनिक कामां-तून प्रकट होऊं लागलें.

एकदां गांधींचे एक ओळखीचे गृहस्थ त्यांच्याकडे आले आणि म्हणाले, "भाई, मी पैशाच्या अतिशय अडचणींत आहें. तीनशें पौंडांची गरज आहे. मला जरा उसने द्या, मी चार दिवसांत परत आणून देईन."

गृहस्थ नेकीचा आहे हें गांधी जाणत होते, त्याची अडचणहि खरी होती. पण त्यांच्यापाशीं त्या वेळीं पैसे नव्हते. बँकेंत पैसे होते ते नाताळ इंडियन कॉंग्रेसचे होते. ते पैसे काढण्याचा अधिकार गांधींच्याकडे देण्यांत आला होता. गांधींनीं त्याला तीनशें पौंडांचा चेक काढून दिला. तो गृहस्थ धन्यवाद देत निघून गेला.

तो गेला अन् गांधींची विवेकबुद्धि जागी झाली. आपण कुणाचे पैसे अन् कुणाला दिले ? ते पैसे इतर कामीं वापरण्याचा आपल्याला अधिकार काय ? आपल्यावरच्या विश्वासाला योग्य असें हें आपलें वर्तन झालें काय ? मित्राजवळ आपली प्रतिष्ठा राहावी याकरितां स्वतःचे पैसे खुशाल वापरावे; पण दुसऱ्यांचे–विशेषतः सार्वजनिक संस्थेचे–पैसे वापरणें हा त्या विश्वासाचा गैरफायदा घेणें नव्हे काय ? आपल्या हातून हें महापातक झालें असें गांधींना वाटलें. या पापाचें प्रायश्चित्त घेतल्यावांचून त्यांच्या जिवाला चैन वाटेना. पण तें घ्यायचें म्हणजे ती रक्कम ताबडतोब भरून टाकायची, तेवढी रक्कम तर त्यांच्यापाशीं नव्हती. काय करायचें ?

सत्यनारायणाला आपल्या या भक्ताची दया आली असावी. ९० अशीलांचें एक काम कोर्टांत निघालें. त्यांची आलेली फी गांधींनीं लगेच बँकेंत भरून टाकली आणि कानाला खडा लावला कीं इतःपर सार्वजनिक पैशाचा तात्पुरता सुद्धां वापर खाजगी वा तद्व्यतिरिक्त कामाखेरीज दुसऱ्या कामाकडे करायचा नाहीं !

नाताळ इंडियन काँग्रेस काय किंवा ट्रान्सवाल ब्रिटिश इंडियन असोसिएशन काय या संस्थांचे गांधी कार्यवाह असतांना त्या त्या संस्थांचे हिशेब आदर्श स्वरूपांत चोख असत, याची ग्वाही आजहि मिळते. याचें कारण गांधी आपल्या प्रत्येक हालचालीकडे धार्मिक दृष्टीनें पाहूं लागले होते हें आहे.

• • •

म...
अनु...
क्रमांक...
दि..............

# किनाऱ्याजवळचें तुफान

: ७ :

अडीच वर्षें झालीं. पण तात्पुरतें म्हणून घेतलेलें अन्यायनिवारणाचें काम संपण्याचीं चिन्हें दिसेनात, नव्हे तें वाढतच जाणार असें दिसूं लागलें तेव्हां गांधी काँग्रेसची परवानगी घेऊन सहा महिन्यांकरितां हिंदुस्थानांत आले. आपलें कुटुंब दक्षिण आफ्रिकेला घेऊन जाण्याचा त्यांनीं विचार केला होता, त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेंतल्या हिंदी जमातीवर चाललेला गोऱ्यांचा अन्याय हिंदुस्थानांतल्या जाणत्या लोकमताच्या कानावर घालावा असाहि त्यांचा विचार होता.

पण सहा महिने पुरे होण्यापूर्वींच नाताळहून तार आली कीं ' तावडतोब या. ' त्याबरोबर आपली पत्नी आणि दोन मुलगे यांना घेऊन गांधी दादा अब्दुल्लांच्याच ' कुरलँड ' नांवाच्या बोटीनें नातालकडे जायला निघाले. याच बोटीच्या मागोमाग ' नादीरा ' नांवाची दुसरीहि एक बोट दक्षिण आफ्रिकेकडे निघाली होती.

डरबन बंदर आतां ४ दिवसांच्या वाटेवर राहिलें होतें. इतक्यांत समुद्रांत एवढें जबरदस्त तुफान झालें कीं सर्वांची पांचावर धारण बसली. समुद्र खवळला होता आणि लाटांचे डोंगर बोटीवर येऊन आदळत होते. बोट असे हेलकावे खाऊं लागली होती कीं कोणत्या क्षणीं ती पालथी होईल याचा नेम नव्हता. बोटीवरच्या उतारूंत हलकल्लोळ माजला.

पण अशा धोक्याच्या प्रसंगीं सुद्धां गांधी घाबरून गेले नाहींत. त्यांचें मन स्थिर राहिलें. सर्व उतारूंमध्यें ते एकसारखे फिरून सर्वांना धीर देत होते, ईश्वरावर भरंवसा ठेवायला सांगत होते. सर्वांना या माणसाचा केवढा आधार

वाटला ! त्यांच्या धीरानें आणखी माणसांना धीर आला आणि त्यांनीं इतर माणसांना आवरण्याचें काम केलें.

हें नैसर्गिक तुफान थांबलें; परंतु किनाऱ्याजवळच आतां दुसरें मोठें तुफान सुरू झालें. आपण अशा प्रसंगींसुद्धां शांत राहूं शकतों असा गांधींनाच स्वतःचा अनुभव आला. त्याचा त्यांना आनंद वाटला. पण दुसरें एक तुफान त्यांच्यापुढें दत्त म्हणून उभेंच होतें. हें तुफान होतें गोऱ्यांनीं निर्माण केलेलें. हा 'कूली' बॅरिस्टर' आतां आपल्याला जड होऊं लागला आहे, त्यानें नाताळांत 'कूली' हिंदींची संघटना बनविली आहे अन् तो आपल्याला शह देऊं पाहात आहे, हिंदुस्थानांत जाऊन यानें आमची नाचक्की केली आणि आतां दोन बोटी भरून आठशें हिंदी लोकांना तो येथें घेऊन आला आहे, दक्षिण आफ्रिका याला हिंदी जमातीनें भरून टाकायची आहे, अशा विपरीत समजुतींनीं भरून आणि भारावून गांधीला अन् त्यानें आणलेल्या हिंदी लोकांना उतरूंच द्यायचें नाहीं असा त्यांनी निर्धार केला. त्यांच्या भावनांना चिथावण्याचें काम मि. एस्कोंब व इतर गोऱ्या पुढाऱ्यांनीं केलें होतें. डरबनमध्यें राहणारे सर्व गोरे बंदरावर जमा झाले होते आणि 'गांधी परत जा,' 'कूलींनो, उतरलांत तर समुद्रांत फेकून देऊं' अशा घोषणा त्यांनीं चालविल्या होत्या. नाताळ सरकारलाहि या लोकांनीं बजावलें होतें कीं, तुम्ही या लोकांना येथें उतरूं देतां कामा नये. बोटी आल्या पावलीं परतवून लावा.

सरकार बोटींना परतवून लावूं शकत नव्हतें किंवा उतारूंना अडवूंहि शकत नव्हतें. वेळ काढण्याच्या इराद्यानें सरकारनें या बोटींना बंदरापासून कांहीं अंतरावर क्वारंटाईन या सबबीखालीं तेवीस दिवस अडकवून मात्र ठेवलें. क्वारंटाईन म्हणजे सांथीच्या प्रदेशांतून आलेल्यांना कांहीं काळ बाजूस ठेवणें. हे तेवीस दिवस दोन्ही बोटींवरचे उतारू कशा अवस्थेंत राहिले असतील हें सांगायला नको. तथापि या तुफानाला मात्र त्यांतलें कोणीहि घाबरलें नाहीं. उतरायचेंच असा सर्वांनीं पक्का निश्चय केला. सरकारकडून आणि डरबनमधल्या मित्रांकडून गोऱ्या लोकांच्या क्षोभाची कल्पना बोटींवरच्या सर्व लोकांना देण्यांत आली. गांधींनीं सर्वांना परिस्थिति समजावून दिली. सर्वांची निर्भयता आणि निश्चय बघून गांधींना समाधान झालें.

तेवीस दिवसांनीं बोटी धक्क्याला लागल्या. तोंवर गोरे लोक कांहींसे शांत

झाले होते—त्यांच्या पुढाऱ्यांनींहि त्यांची समजूत घातली होती. पण गांधींवरचा राग शमला नव्हता म्हणून मि. एस्कोंबकडून मित्रत्वाचा निरोप म्हणून गांधींना आला, कीं सर्व हिंदी माणसें उतरून जाऊं द्यात; सरकार त्यांना संरक्षण देत आहे. तुमचीं मुलेंमाणसेंहि उतरूं देत; पण तुम्ही मात्र सायंकाळ होईपर्यंत थांबा.

कप्तानानें हा निरोप गांधींना सांगितला. गांधींनीं तो मान्य केला. इतक्यांत दादा अब्दुलांचे गोरे वकील मि. लॅटन बोटीवर आले. ते गांधींचे मित्र होते. त्यांनीं गांधींना म्हटलें, " तुम्ही कां थांबलात ? चला, आपण जाऊं. "

गांधी म्हणाले, " मला तसा मि. एस्कोंब यांचा निरोप आला म्हणून मी थांबलों. "

" तुम्ही उतरायला भितां ? "

" छेः छेः, मुळींच नाहीं. "

" मग चला तर माझ्या बरोबर. अशा रीतीनें तुम्ही थांबणें म्हणजे तुम्ही भ्यालांत असा त्याचा अर्थ होईल. अन् मला तें इष्ट वाटत नाहीं. "

गांधी लगेच मि. लॅटन बरोबर बंदरांत उतरले. त्या वेळीं बंदरावर फारशीं माणसें नव्हतीं. गांधींना पारसी रुस्तुमजी या आपल्या मित्राच्या घरीं मैल दीड मैल चालत जायचें होतें. आणि रस्ता गोऱ्यांच्या मोहोल्ल्यांतून होता. वाटेंत कांहीं मुलांनीं गांधींची ती ओळखीची पगडी बघितली. त्याबरोबर तीं ओरडलीं, " गांधी, गांधी. "

लगेच माणसें जमलीं. गर्दी वाढूं लागली. ' लॅटन यांनी गांधींचा हात धरला होता. पण इतक्यांत जमावांतलीं कांहीं माणसें दोघांवर तुटून पडलीं आणि त्यांनीं लॅटनना गांधींपासून तोडून दूर नेलें. गांधींवर लाथांचा व बुक्क्यांचा वर्षाव सुरू झाला.

या माराखालीं गांधींचा चेंदामेंदाच झाला असता, पण एवढ्यांत पोलिस सुपरिंटेंडेंट ॲलेक्झांडर यांची बायको रस्त्यानें चालली होती. तिनें हा प्रकार पाहिला. ती धांवली आणि आपली छत्री उघडून तिनें मरगळलेल्या गांधींना संरक्षण दिलें. कोणी सज्जनानें धांवत जाऊन पोलिस सुपरिंटेंडेंटला हकीकत कळविली. ते पोलिस तुकडी घेऊन आले आणि त्यांनीं जमाव पांगविला. गांधींना त्यांनीं पोलिस ठाण्यांत नेलें आणि तेथेंच थांबण्यास सांगितलें. पण गांधी म्हणाले,

लोकांचा गैरसमज झाला आहे. आपली चूक लक्षांत आली, कीं ते पूर्ण शांत होतील. मी असाच मुक्कामावर जातों. " आणि ते तडक मुक्कामाकडे गेले. सुपरिंटेंडंटानें कांहीं पोलिसांना त्यांच्या रक्षणासाठीं बरोबर पाठविलें.

पण गांधींचा अजमास चुकला. सायंकाळ झाली, अंधार पडूं लागला, आणि लोक पुनः पारसी रुस्तुमजींच्या घरापुढें जमले. " गांधी, गांधी पाहिजे आम्हांला. त्याला आम्ही जिवंत जाळणार आहोंत; " असा त्यांचा गलका सुरू झाला.

पुनः पोलिस सुपरिंटेंडेंट पोलिसांची तुकडी घेऊन आले. परिस्थिति पाहून त्यांनीं आपल्या माणसांकरवीं गांधींना घरांत हळूच निरोप पाठविला, कीं ' आपल्या मित्रांचें घर आणि मालमत्ता सुरक्षित राहावी असें तुम्हांला वाटत असेल तर झटकन् माझा मांणूस सांगेल तशा रीतीनें घराबाहेर पडून पोलिस ठाण्यांत जा. '

गांधींनाहि परिस्थितीची जाणीव आली. त्यांनीं सुपरिंटेंडेंटच्या माणसानें आणलेला पोलिसाचा वेष चढविला, बरोबरच्या पोलिसांनी हिंदी दुकानदाराचे वेष केले आणि मागच्या दारानें शेजारच्या दुकानांत जाऊन तेथून सरळ लोकांच्या जमावांत शिरून त्यांनीं पोलिसठाणें गांठलें !

गांधींना जो मार बसला त्याबद्दल त्यांना कोणाचीं नांवें घ्यायचीं असलीं तर घ्यावींत, पोलिस त्यांना पकडून त्यांच्यावर खटला भरील, असा निरोप मि. एस्कोंब यांच्याकडून आला. खुद्द साम्राज्य सरकारच्या वसाहतमंत्र्यांनीं या प्रकाराची चौकशी होऊन गुन्हेगारांना शिक्षा झाली पाहिजे असें नाताळ सरकारला कळविलें होतें; पण गांधींनीं तें नाकारलें. ते म्हणाले, " लोकांचा यांत काय दोष ? त्यांना जसं चिथावण्यांत आलं तसं ते वागले. त्यांचा माझ्याविषयीं गैरसमज कुणीं करून दिला ? तेच या प्रकरणांत दोषी आहेत. कुणाचींहि नांवें मला सांगायचीं नाहींत आणि तसें त्यांनीं लिहूनहि दिलें !

डरबनच्या गोऱ्या इंग्रज नागरिकांवर या उदारतेचा अतिशय परिणाम झाला आणि विरोध करणाऱ्यांपैकी अनेक जण गांधींना पाहूं लागले.

• • •

## ‘ येरवित्तधन मृत्तिकेसमान ’ : ८ :

१९०१ साल. गांधीभाई कायमचे स्वदेशाला परत जायला निघाले आहेत. गेल्या पांचसहा वर्षांत त्यांनी केवढी मोठी हिंदी जमातीची सेवा केली, असें हिंदी जमातींतल्या हिंदु-मुसलमान-पारसी-ख्रिस्ती सर्वांना वाटत आहे. जमातीवरचा अन्याय काढून टाकला जावा म्हणून रात्रंदिवस ते स्वतः राबले, अनेकांना राबण्याचें शिकविलें. जमातीची प्रतिष्ठा वाढावी म्हणून मुलांबाळांपासून मोठ्यां-पर्यंत सर्वांना अतिशय प्रेमानें अनेक गोष्टी शिकविल्या; इतकेंच नव्हे, तर नुक-त्याच संपलेल्या बोअर युद्धांत इंग्रजांच्या सैन्यांत हिंदी लोकांचें शुश्रूषा-पथक नेऊन शत्रूच्या गोळ्यांचा वर्षाव होत असतांनासुद्धां जखमी लोकांना रणांगणांतून दहा दहा आणि वेळीं चाळीस पन्नास मैलसुद्धां डोल्यांतून हलवून त्यांची सेवा-शुश्रूषा केली आणि अशा रीतीनें ‘ हिंदीसुद्धा आमचेच भाई ’ असें गोऱ्या इंग्रजांना वाटायला लावलें. स्वतःच्या शरीराची किंवा कुटुंबाची सुद्धां त्यांनीं कधीं पर्वा केली नाहीं.

असे गांधीभाई आज आपल्याला सोडून स्वदेशाची सेवा करण्याकरितां जात आहेत. त्यांना निरोप देण्याची प्रचंड सभा डरबनमध्यें भरली आहे. एका-मागून एक वक्ते भरल्या अंतःकरणानें गांधीभाईचा गौरव करीत आहेत. सर्वांची मागणी एकच आहे, कीं जर पुनः जरूर लागली तर गांधीभाईंनीं इकडे आलें पाहिजे.

आणि भाषणाच्या शेवटीं त्यांच्यावर आणि कस्तुरबाईवर देणग्यांचा वर्षाव झाला. यांत गरीबगुरीब गिरमिट्यांच्यासुद्धां देणग्या होत्या. या देणग्यांत सोन्या-चांदीच्या वस्तू होत्या, तशा हिरे-माणकांच्याहि वस्तु होत्या. कस्तुरबाईंना खास

एक मूल्यवान् हार मिळाला होता. गांधी व्यासपीठावर बसले होते, पण त्यांचें मन चोरल्यासारखें झालें होतें. भाषणें ऐकत असतांना तेथून पळून जावेंसें त्यांना वाटत होतें. आपला इतका गौरव त्यांना असह्य वाटत होता.

सभा आटोपून गांधी घरीं आले. त्या सर्व देणग्याहि घरीं येऊन पोंचल्या. कस्तुरबाईंनीं आणि मुलांनीं उत्सुकतेनें त्या साऱ्या उलगडून पाहिल्या. एक एक पहातांना त्यांना केवढा आनंद वाटत होता.

पण गांधींचा आत्मा नागासारखा फणा काढून त्यांना डंख मारीत होता. ते अंथरुणावर पडले पण झोप येईना. ते खोलींत येरझारा घालूं लागले.

हे नजराणे आपल्याला लोकांनी दिले म्हणून ते आपले मानणें रास्त होईल काय ? लोकांना ते कां द्यावेसे वाटले ? मी केलेल्या सेवेकरितां. मीं सेवा केली ती मोलाची इच्छा ठेवून केली नाही. सेवा केली तिचा मोबदला म्हणजे ती करीत असतांना होणारा आनंद. तो तर मला मिळून चुकला. मग हे दागदागिने अन् या मोलाच्या वस्तू आपण घ्यायच्या ? त्या घेणें म्हणजे सेवा विकल्यासारखें होईल. सेवा ही विकण्याची का वस्तु आहे ? हें सर्व परत केलें पाहिजे माझें जीवन—माझी कौटुंबिक राहणी तर साधी. जास्तींत जास्त साधी—करण्याचा माझा प्रयत्न. या वस्तूंनीं ती साधी राहील का ? माझी एक गोष्ट सोडा; मी यांचा माझ्या मनावर परिणाम नाहीं होऊं देणार, पण कस्तुरबाई ? आणि मुलें ? जें वळण मी त्यांना देऊं इच्छितों त्याला या वस्तूंचा वापर मारक नाहीं का ? पण या वस्तूंचें काय करायचें ? त्या मी जर परत केल्या तर लोकांच्या मनाला काय वाटेल ? आणि कस्तुरबाई अन् मुलें त्या परत करूं देतील का ?

गांधींचें मन गोंधळून बावरून गेलें; काय करावें तें सुचेना. पण शेवटीं मनाचा निर्णय झाला. या वस्तू आपल्याला ठेवतां येणार नाहीं . त्या लोकांनीं दिल्या तर लोकांच्याच कामीं त्या लागल्या पाहिजेत. आपल्या प्रौढ सहकाऱ्यांपैकीं कांहींची एक कमिटी बनवून विश्वस्तनिधि म्हणून त्यांच्या ताब्यांत त्या द्याव्यात. ठरलें. या निर्णयानें गांधींना एकदम हायसें वाटलें. आतां मुलांना अन् कस्तुरबाईंना हें समजावून द्यायचें राहिलें.

त्यांनीं मुलांना बोलावलें आणि आपला सारा विचार त्यांना समजाविला. मुलांना तो पटला. बापू सांगतील तें त्यांना नेहमीं बरोबरच वाटायचें. आतां मुलांनींच आईलाहि तो विचार पटवून द्यावा असें गांधींनीं मुलांना सांगितलें.

पण ती इतकी सोपी गोष्ट नव्हती. कस्तुरबाई त्या वस्तू हातच्या सोडायला तयार होईनात.

“ तुम्हांला नसली जरूर तर तुम्ही नका घेऊं. मुलांना काय ? फितवावं तशीं फिततात. मला नाहीं घालूं दिलंत तर मीहि नाहीं घालणार ? पण उद्यां माझ्या सुना येतील, त्यांना तर त्या उपयोगाला येतील ? आणि उद्यांचा दिवस कसा येईल हें तरी कुणीं पाहिलं आहे ? लोकांनीं इतक्या प्रेमानं दिलं न् तुम्ही तें परत करणार म्हणतां—”

“ मुलगे मोठे झाले म्हणजे स्वतःला न् स्वतःच्या बायकांना जें लागेल तें मिळवितील. आणि आपण साधेपणानं राहायचं ठरवलंय तर आपल्या सुना तरी छानछोकीच्या आपण कशा मिळवूं ? बरं करावेसे वाटले कांहीं दागिने तर मी आहेच कीं ! ” गांधी समजूत घालूं लागले.

“ हो हो, माहीत आहे तुम्ही आहांत ते ! माझे होते ते दागिनेसुद्धां काढून घेतलेत अन् आतां सुनांसाठीं तुम्ही नवे घेणार ! मला हें तें कांहीं माहीत नाही; मी हे दागिने मुळींच परत करूं देणार नाहीं. अन् माझ्या हारावर तुमची काय हो सत्ता ? ” कस्तुरबाईच्या डोळ्यांतून अश्रुधारा सुरू झाल्या.

“ अग, पण तो हारसुद्धां मी केलेल्या सेवेबद्दलच मिळाला आहे ना ? कीं तूं कांहीं कामगिरी करायला गेली होतीस ? ”

“ तुमची कामगिरी ती माझीसुद्धां नाहीं वाटतं ? मला रात्रंदिवस राबविलीत, नको त्याची चाकरी करायला लावलीत, आणि म्हणे तुझी कामगिरी काय ? ”

हे वाग्बाण गांधींच्या अंतःकरणाला भेदून गेले, पण त्यांनीं आपलें अंतःकरण कठोर केलें, बायकोची संमति कशी बशी पदरांत पाडून घेतली आणि मागें पहिल्या खेपेस हिंदुस्थानाला परत जातांना मिळालेल्या आणि या वेळच्या या, अशा पक्षकारांकडून मिळालेल्या देणग्यांचा एक सार्वजनिक विश्वस्त निधि बनविला. या दागिन्यांवर अनेक वेळां त्यांनीं सार्वजनिक कामाकरितां लागणारे पैसे काढले. आजहि आपत्तिनिधि म्हणून तो निधि दक्षिण आफ्रिकेंत कायम आहे !

● ● ●

# धर्मश्रद्धेची कसोटी : ९ :

गांधी हिंदुस्थानांत परत येऊन मुंबईंत वकिली चालू करण्याच्या उद्देशानें स्थायी झाले. ना. गोखल्यांशी त्यांचे संबंध यापूर्वीच निकटचे झाले होते आणि त्यांच्या पायाशीं बसूनच हिंदुस्थानांत करावयाच्या सार्वजनिक कामाचे धडे घ्यावेत असें त्यांनीं ठरविलें होतें, म्हणून त्यांनीं मुंबई निवडली आणि तेथें आपलें ऑफिस थाटलें.

गांधी हे स्वभावतः स्वतंत्र बुद्धीचे आणि प्रयोगशील गृहस्थ होते. दक्षिण आफ्रिकेंत असतांना त्यांनीं स्वतःला होणाऱ्या लहान लहान दुखण्यांवर अनेक डॉक्टरी उपचार करून घेतले; पण त्यामुळें त्यांना पुरतें बरें वाटलें नाहीं, म्हणून त्यांनी क्यूने आणि जुस्ट या प्रसिद्ध निसर्गोपचारकांचीं पुस्तकें वाचून त्यांत सांगितलेले उपचार स्वतःवर करण्याला सुरुवात केली, आणि काय आश्चर्य ! डॉक्टरांना जें साधलें नाहीं, तें या उपचारांनीं साधलें. त्यांचा उपद्रवी बद्धकोष्ठ आणि तज्जन्य इतर विकार नाहींसे झाले. त्यामुळें नैसर्गिक उपचारांवरची त्यांची श्रद्धा वाढली. आणि गांधींची श्रद्धा म्हणजे अगदीं धर्मश्रद्धा ! त्या श्रद्धेची कसोटी लागण्याचा एक मोठा प्रसंग मुंबईंत असतांना त्यांच्यावर आला.

त्यांचा दुसरा मुलगा मणिलाल तापानें आजारी पडला. डॉक्टरांनीं विषम-ज्वराचें निदान केलें, ताप कांहीं केल्या उतरेना. त्याला वातहि झाला आणि सन्निपाताचीं चिन्हेंहि दिसूं लागलीं.

डॉक्टर म्हणाले, “ याची शक्ति टिकवून धरली पाहिजे. ताप हटेल तेव्हां हटेल, पण अगोदर त्याला अंडीं आणि चिकनसूप दिलं पाहिजे. ”

" अंडीं आणि चिकन्सूप ? " गांधी डॉक्टरांना म्हणाले.

" डॉक्टर, आम्ही कट्टर निरामिषाहारी आहोंत. मांसाचे पदार्थ खाणें-पिण आम्ही पाप समजतों. दुसरं नाहीं का कांहीं देतां येण्यासारखं ? "

डॉक्टर म्हणाले, " दुधांत पाणी मिसळून देतां येईल, पण त्यानं हवं तेवढं पोषण त्याला मिळणार नाहीं. त्याचा जीव या वेळीं धोक्यांत आहे, म्हणून या वेळीं धर्मनिर्बंध कांहीं मधें आणू नका. औषध म्हणून सांगतों तें घ्यायला कांहीं हरकत नाहीं- "

पण गांधींच्या चित्तांत तें उतरलें नाहीं. ते म्हणाले, " मुलगा मोठा असता तर त्याचा तो या वेळीं विचार करूं शकला असता. पण तो आहे लहान, तेव्हां त्याचा बाप म्हणून मलाच त्याच्याबद्दल विचार केला पाहिजे. माझं मन धर्माविरुद्ध जायला घेत नाहीं. म्हणून मी त्याला आपण म्हणतां तें देऊं इच्छित नाहीं. अर्थात् आपण म्हणतां तो धोका मला पत्करावा लागेल. पण मला कांहीं उपचारांची माहिती आहे. मी ते करून पहातों. आपण माझ्यावर एवढे उपकार करा कीं रोज येऊन याची नाडी, छाती वगैरे सारी प्रकृति तपाशीत जा आणि काय परिणाम होतो तो मला सांगा. मला तें तपासण्याचं ज्ञान नाही; म्हणून आपली मदत मागतों. "

डॉक्टरांनीं तें मान्य केलें आणि गांधींनीं आपल्या नैसर्गिक उपचारांना सुरुवात केली. त्यापूर्वी त्यांनी दहा वर्षांच्या मणिलालला हें सर्व समजावून सांगितलें आणि ' माझे उपचार करूं कीं तूं डॉक्टर सांगतात तें घेशील ? " असें विचारलें. मणिलालनें वडिलांना त्यांचे उपचार करायला सांगितलें, अंडीं वगैरे आपण घेणार नाहीं असें तो म्हणाला.

मग गांधींनीं डॉ. क्यूनेचे पाण्याचे उपचार त्याच्यावर सुरू केले. त्याला खायला मोसंबीच्या रसांत थोडें पाणी मिसळून देऊं लागले. तथापि ताप हटेना. तो १०४ डिग्रीपर्यंत चढे, मणिलाल वातांत बडबडे. गांधींना विचार पडला. आपण डॉक्टरांचा उपचार बाजूला सारून स्वतःवर फार मोठी जबाबदारी घेतली आहे, असें त्यांना वाटूं लागलें. दुसऱ्या डॉक्टराला किंवा वैद्याला बोलवावें का ? आपल्याला जर वैद्यकाचें पूर्ण ज्ञान नाहीं तर आपली अक्कल चालवून धोका पत्करावा का ? उलट दुसरेही विचार मनांत आले कीं आपली निसर्गाच्या उपचारांवर श्रद्धा आहे, औषधावर नाहीं; डॉक्टर लोक तरी काय,

प्रयोगच करीत असतात; ते जगविण्याची हमी देऊं शकत नाहींत, जगवणें-मारणें फक्त एका ईश्वराच्याच हातीं असतें; त्याच्यावरच आपण श्रद्धा ठेवावी आणि आपला इलाज चालू ठेवावा.

अशी विचारांची उलथापालथ त्यांच्या चित्तांत चालली असतांना रात्र पडली. ताप तर खूप चढलेला होता. गांधींनीं मनाचा निश्चय केला. त्यांनीं एक चादर थंड पाण्यांत चांगली भिजवून खूप पिळून काढली आणि मणिलालच्या पायांपासून मानेपर्यंत ती लपेटली. डोक्यावर ओला टावेल ठेवला. वर दोन कांबळीं पांघरलीं, तापानें सारें अंग खरखरत होतें, घामाचें नांव नव्हतें.

दिवसभराच्या श्रमानें आणि चिंतेनें गांधी थकून गेले होते. जरा बाहेर समुद्राकांठीं जाऊन यावें, तेवढाच ताजेपणा येईल असा विचार करून कस्तुरबाईंना मुलाजवळ बसवून ते बाहेर पडले आणि चौपाटीवर गेले. या वेळीं रात्रींचा दहाचा सुमार होता. माणसांची वर्दळ कमी होती. गांधींनीं मनांत रामाचा धांवा सुरू केला होता. ' रामा तूंच आतां माझी लाज राख. '

कांहीं वेळ फिरून ते लगेच परतले. त्यांचीं पावलें वाजलेलीं ऐकून मणिलालनें हांक मारली, " बापू, आलांत ? "

" हो बाळ " असें म्हणत गांधी त्याच्याजवळ गेले.

त्यानें करुण मुद्रेनें त्यांच्याकडे पाहून म्हटलें, " बापू, मला यांतून काढा ना. अंगाची काहिली होते आहे– "

" का रे ? घाम येतोय का ? "

" घामानं चिंब झालों आहें मी, माझा जीव गुदमरून गेलाय्, यांतनं मला मोकळं करा ना. "

गांधींनीं मुलाच्या कपाळावर हात ठेवला. सबंध चेहरा घामानें डवरला होता. ताप उतरत चालला होता.

" मणि, तुझा ताप आतां उतरत चाललाय बाळ, आतां थोडा-अगदीं थोडा वेळ कळ सोस, हं. लगेच मी चादर काढून टाकतों. "

" नाहीं, नाहीं, बापू ; आतां मला सोडवा, पुनः पाहिजे तर असं करा, पण आत्तां चादर काढून टाका ना. "

कित्येक दिवस घाम येत नव्हता तो भरपूर आल्यानें गांधींना आतां धीर आला होता. आणखी थोडा घाम येऊं द्यावा म्हणून इकडच्या तिकडच्या गोष्टी

बोलून त्यांनीं आणखी थोडा वेळ काढला आणि मग चादर काढून मणिलालचें सबंध अंग पुसून काढलें आणि बापलेक एकत्र गाढ झोपले.

सकाळीं ताप कमी आला होता, पुरता निघाला नाहीं, पण तो आटोक्यांत आला होता. पाणी मिसळून दूध आणि फळांचा रस यावर चाळीस दिवस ठेवल्यानंतर मणिलाल पूर्ण बरा झाला.

गांधी आपल्या श्रद्धेच्या कसोटीला असे पूर्ण उतरले.

• • •

वाचनालय
क्रमांक

# सत्याग्रहाचें सामर्थ्य

: १० :

१९०६ ते १९१३. अशीं ८ वर्षे गांधी दक्षिण आफ्रिकेच्या सरकारशीं अविश्रांतपणें लढले. सरकारनें हिंदी जमातीशीं उभा दावाच धरला होता. हिंदी लोकांना दक्षिण आफ्रिकेंत स्थायी होऊं द्यायचें नाहीं, त्यांना नागरिकत्वाचे गोऱ्यांच्या बरोबरीचे हक्क द्यायचे नाहींत, त्यांना गोऱ्या व्यापाऱ्यांशीं चढाओढ करूं द्यायची नाहीं, दक्षिण आफ्रिकेंत हिंदी लोकांची संख्या वाढूं द्यायची नाहीं असा सरकारनें निश्चयच केला होता. गोऱ्या रहिवाश्यांचे आणि सरकारचे हिंदी जमातीविषयींचे गैरसमज दूर करायचे, हिंदी जमातीला आपली संख्या जादा माणसें भरून वाढवायची नाहीं, गोऱ्यांच्याशीं व्यापारांत चढाओढ करावयाची नाहीं, राजकीय सत्ता मिळवायची नाहीं, हें त्यांना पटवून द्यायचें, पण त्याचबरोबर गोऱ्यांच्या बरोबरीचें नागरिकत्व मिळालें पाहिजे, हिंदी किंवा आशियाई लोक गोऱ्यांहून कोणत्याहि प्रकारें कमी प्रतीचे नाहींत अशी कायद्याच्या क्षेत्रांत भूमिका राहिली पाहिजे; हा आग्रह आणि प्रयत्न सोडायचा नाहीं हा गांधींच्या नेतृत्वाखालीं हिंदी व आशियाई जमातीचा निश्चय होता. आपला हा निश्चय सिद्धीला नेण्याकरितां प्रतिपक्षाला कोणत्याहि प्रकारची शारीरिक दुखापत न करतां सरकारचे अन्यायी व अपमानकारक कायदे मोडून त्याकरितां होणाऱ्या शिक्षा स्वतः सोसायच्या आणि त्यांच्या समजुतींत पालट घडवून आणायचा अशी गांधींची पद्धत होती. हिलाच त्यांनीं 'सत्याग्रह' असें नांव दिलें होतें.

पण केवळ प्रतिपक्षाच्याच मनाचा त्यांना पालट करावयाचा नव्हता तर स्वकीय हिंदी लोकांना सुद्धां खऱ्या सत्याग्रही वृत्तीचें शिक्षण द्यावयाचें होतें. वळण लावायचें होतें.

ट्रान्सवाल सरकारनें कायदा केला होता कीं, –

( १ ) ट्रान्सवालांत राहण्याचा हक्क असलेल्या सर्व हिंदी स्त्री-पुरुष आणि आठ वर्षांवरील मुलेंमुली यांनी आशियाई खात्याच्या कचेरींत अर्ज करून आपलीं नांवें नोंदवून घ्यावीं आणि राहण्याचा परवाना मिळवावा. ( २ ) हे परवाने घेतांना जुने परवाने अधिकाऱ्यांना सुपूर्त करावेत. ( ३ ) नोंद करून घेण्याकरितां करावयाच्या अर्जांत आपलें नांव, गांव, जात, वय वगैरे द्यावींत. ( ४ ) नोंद करणाऱ्या अधिकाऱ्यानें अर्जदाराच्या अंगावरच्या मुख्य खुणा टिपून ठेवाव्यात. ( ५ ) अर्जदाराच्या सर्व बोटांचे आणि अंगठ्यांचे ठसे घ्यावेत. ( ६ ) मिळालेला परवाना प्रत्येकानें आपल्या सोबत सतत बाळगला पाहिजे, कोणीहि सरकारी अधिकारी जेथें कोठें आणि जेव्हां केव्हां तो पाहायला मागेल तेथें आणि तेव्हां तो काढून दाखवितां आला पाहिजे. ( ७ ) ठराविक मुदतीच्या आंत अर्ज करून परवाना न काढणें हा गुन्हा ठरेल. हा कायदा हिंदी जमातीचा जणूं खून करण्याकरितांच योजला होता.

या ‘ खुनी ’ कायद्याचा निषेध करण्याकरितां जोहान्सबर्गमध्ये एक जंगी सभा भरली. लोकांत विलक्षण उत्साह संचरला होता. या कायद्याचा प्रतिकार करणें कां अवश्य आणि तो कसा करायचा हें गांधींनीं सर्वांना समजावून दिलें. सर्वांनीं ठराव केला, कीं हा कायदा रद्द होणार नाहीं तोंवर तो मोडून आपण तुरुंग वगैरे ज्या शिक्षा होतील त्या भोगूं. गांधींनीं एक सत्याग्रह मंडळ स्थापन केलें व त्याच्या वतीनें हा लढा चालविण्याचें ठरविलें.

या कायद्याप्रमाणें सरकारनें आशियाई जमातीवर नोंदणीचा हुकूम बजावला. पण हिंदी लोकांनीं तो फेटाळून लावला, शेकडो लोकांना तुरुंगांत टाकण्यांत आलें. गांधीहि तुरुंगांत गेले. कायदा कोणी मानला नाहीं, तेव्हां सरकारला तडजोड करणें भाग पडलें, स्वखुषीनें नोंदणी करून घ्यावी, तीन महिन्यांच्या मुदतींत जर सर्व हिंदी लोक आपली नोंदणी करून परवाने घेतील तर हा खुनी कायदा रद्द करूं असें सरकारतर्फे आश्वासन देण्यांत आलें. सर्व सत्याग्रही कैद्यांना सोडण्यांत आलें.

या तडजोडीला अनुसरून स्वखुषीनें प्रत्येकानें आपली नोंद करून घ्यावी असें गांधींनीं लोकांना सांगितलें. पण कांहीं लोकांना गांधींची ही उलटी उडी वाटली. एकदां या गृहस्थांनीं परवाने काढूं नका, बोटांचे ठसे देऊं नका म्हणून

आग्रहपूर्वक सांगितलें काय आणि तेच गृहस्थ आतां आग्रहपूर्वक परवाने काढा, थोटांचे ठसे द्या असें उलट सांगतात काय, कांहीं पठाण लोकांना तर गांधींनीं लांच घेऊन हिंदी लोकांना फशीं पाडण्याचें ठरविलें असलें पाहिजे असा दाट संशय आला. थोटांचे ठसे देणें हें तर त्यांना अत्यंत अपमानाचें वाटत होतें. सक्ति आणि खुषी यांतला फरक त्यांना कळत नव्हता. या फसव्या पुढाऱ्याला अद्दल घडविली पाहिजे असा त्यांच्यांत गुप्त विचार झाला.

पठाणांची ही मसलत गांधींच्या भोवतीं असणाऱ्या लोकांच्या कानांवर आली. कॅलनबॅक नांवाचे एक जर्मन एंजीनिअर गांधींचे कट्टे भक्त आणि जिवाला जीव देणारे मित्र होते. गांधींना स्वतःच्या प्राणांची किंमत नाहीं, पण आपण त्यांना जपलें पाहिजे, म्हणून गांधींना न कळत ते सतत गांधींच्या बरोबर राहूं लागले.

एके दिवशीं आपल्या ऑफिसांतून बाहेर जाण्याच्या हेतूनें गांधी आपला कोट खुंटीवरून काढून घेत असतांना जवळच कॅलनबॅक यांच्या कोटाच्या खिशांत कांहीं जड वस्तू त्यांच्या हाताला लागली. काय आहे हें पहाण्याकरितां गांधींनीं खिशांत हात घातला तर त्यांना पिस्तूल आढळलें.

गांधींनीं कॅलनबॅकना बोलावलें आणि विचारलें,

" हें पिस्तूल का खिशांत घालून ठेवलंय ? "

" कांहीं नाहीं, उगीच " कॅलनबॅकनीं संकोचानें उत्तर दिलें.

" रस्किनच्या अन् टॉल्स्टॉयच्या पुस्तकांत पिस्तूल जवळ बाळगून हिंडत जावं असं कुठं आलंय् वाटतं ? " गांधींनीं टॉल्स्टॉयच्या या भक्ताला विनोदानें विचारलें.

कॅलनबॅक ओशाळून म्हणाले, " तुमच्यावर कांहीं गुंड लोक हल्ला करणार आहेत असं मला कळलंय. "

" आणि तुम्ही या पिस्तुलानं त्यांच्यापासून मला वांचवणार आहांत. होय ना ? "

" हो, अन् म्हणूनच मी तुमच्या मागें मागें रहात असतों. "

कॅलनबॅकच्या या बोलण्यावर गांधी खदखदा हंसले आणि म्हणाले, " छान, छान, तेव्हां आतां मला निश्चित व्हायला हरकत नाहीं. माझें रक्षण करण्याची परमेश्वराची सगळी जबाबदारी तुम्हीच उचलल्यानंतर आतां मला कसली काळजी ?

तुम्ही जिवंत आहांत तोंवर मी पूर्ण सलामत आहे, असंच ना ? ईश्वराचा अधिकार तुम्हीं बरा आपल्या हातीं घेतलात ! ”

गांधीजींचे हे शब्द ऐकून कॅलनबॅक विचारांत पडले.

“ विचार कसला करतां ? हीं काय प्रभूवरच्या श्रद्धेचीं लक्षणं ? माझ्या संरक्षणाची चिंता त्याला नाहीं असं तुम्ही समजतां काय ? तो सर्वशक्तिमान् प्रभु समर्थ नाहीं, तुम्हीं आणि तुमचं हें पिस्तूल त्याच्यापेक्षां समर्थ आहे, असंच ना ? ”

कॅलनबॅक नम्र झाले. त्यांना आपली चूक समजून आली. त्यांनीं खिशांतलें पिस्तूल काढून बाजूला ठेवलें. “ इतःपर तुमच्या रक्षणाची चिंता मी करणार नाहीं, ” ते म्हणाले.

परवाने काढण्याच्या पहिल्या दिवशींच जमातीच्या पुढाऱ्यांनीं अगोदर जाऊन परवाने काढावयाचे, म्हणजे लोकांत विश्वास उत्पन्न होईल आणि ते भराभर परवाने काढतील, असें ठरलें होतें. सर्वांत प्रथम आपण परवाना काढणार असल्याचें गांधींनीं सांगितलें होतें.

आशियाई कचेरीकडे जाण्यापूर्वी गांधी इतर पुढाऱ्यांना घेण्याकरितां ऑफिसांत गेले. ऑफिसच्या बाहेरच्या बाजूला मीर आलम नांवाचा पठाण उभा असल्याचें त्यांना दिसलें. तो त्यांचा अशीलहि होता. नेहमीं तो नम्रभावानें अगोदर गांधीभाईंना सलाम करी, पण आज त्याचा हात प्रथम वर उचलला नाहीं. गांधींनीं सलाम केल्यानंतर त्यानें नाइलाजानें सलाम केलासें दिसलें. त्याचा चेहरा नेहमीं-प्रमाणें गांधींना आनंदी दिसला नाहीं. डोळ्यांत राग असल्याचें दिसलें. “ कैसे हो ? ” गांधींनीं विचारलें. “ ठीक है ” त्याचा कोरडा जबाब आला.

गांधी आणि इतर पुढारी मंडळी परवाना काढण्याच्या ऑफिसकडे निघाली. ऑफिस तीनएक मिनिटांच्या अंतरावर राहिलें असेल इतक्यांत मीर आलम गांधींच्या जवळ आला. त्यानें दरडावून प्रश्न केला :

“ कहाँ जाते हो ? ”

गांधींनीं उत्तर दिलें—,“ दश उंगलियाँ दे कर मैं रजिस्टर निकलवाना चाहता हूं. तुम आओगे तो तुम्हारा रजिस्टर पहले निकलनेके बाद में मेरा निकल पाऊं गा. ”

एवढें ते बोलतात न बोलतात तोंच त्यांच्या डोक्यावर एकामागून एक तडाखे बसले. ' हे राम ' म्हणत गांधी बेशुद्ध होऊन जमिनीवर पडले. तरी त्यांच्यावर आणखी मार पडतच होता. दुसरीं माणसें मध्यें पडलीं आणि त्यांनीं कांहीं मार आपल्या अंगावर घेतला. आरडाओरडा झाला. मीर आलम आणि त्याचे सोबती पळाले. दरम्यान पोलिस आले आणि त्यांनीं त्यांना पकडून आपल्या ताब्यांत घेतलें.

बेशुद्ध गांधींना उचलून जवळच्या घरांत नेण्यांत आलें. गांधींना शुद्धी आली. त्यांचा पुढचा ओठ फुटला होता आणि पुढचे दोन दांत मारानें निखळून पडले होते. सर्व अंग ठणकत होतें. शुद्धीवर येतांच पहिला प्रश्न त्यांनीं केला,

" मीर आलम कुठं आहे ? "

" त्याला पकडलं आहे. "

गांधी म्हणाले, " त्यांना सोडलं पाहिजे..."

" तें सर्व होईल, तुम्ही आतां शांत पडा..."

सगळीकडे या माराची बातमी पसरली. आशियाई कचेरीचा खुद्द ऑफिसर गांधींना पहायला आला. त्याला पहातांच गांधी म्हणाले, " तुमच्या ऑफिसांत येऊन बोटांचे ठसे देऊन मी परवाना काढायला निघालों होतों. पण देवाची तशी इच्छा नसावी. आतां इथंच सगळे कागद आणवून कृपा करून माझी अगोदर नोंद करून घ्या. पहिली नोंदणी माझी झाली पाहिजे असं मीं म्हटलंय."

अशा अवस्थेंतसुद्धां कर्तव्याचें भान न विसरणाऱ्या या थोर आत्म्याचे ते शब्द ऐकून अधिकाऱ्याच्या डोळ्यांत पाणी आलें. तो म्हणाला, " तुम्ही आराम घ्या. मागाहून सर्व कांहीं होईल. "

गांधी म्हणाले, " तसं नाहीं. माझी प्रतिज्ञा आहे की मी जिवंत असेन तर अन् ईश्वराला मान्य असेल तर सर्वांच्या अगोदर मीच परवाना काढीन. म्हणून अगोदर कागद घेऊन या. "

गांधींनीं त्याच अवस्थेंत सरकारी वकिलाला तार दिली कीं " मीर आलम आणि त्याचे सोबती यांनीं माझ्यावर केलेल्या हल्ल्याबद्दल मी त्यांना मुळींच गुन्हेगार मानीत नाहीं. त्यांच्यावर फौजदारी चालावी अशी माझी मुळींच इच्छा नाहीं. माझ्याखातर तुम्ही त्यांना सोडून द्यावें. " या तारेमुळें मीर आलमला

आणि इतरांना पोलिसांनीं सोडून दिलें. पण पुढें गोऱ्या नागरिकांच्या आग्रहानें त्यांना शिक्षा झाली.

यानंतर आठ वर्षें चाललेल्या या लढ्यांत अनेक उलथापालथी झाल्या, सरकारनें हिंदी जमातीला दिलेलें वचन मोडलें. हिंदी लोकांनीं गांधींच्या सांगण्यावरून खुषीनें परवाने काढले तरी खुनी कायदा सरकारनें रद्द केला नाहीं. तेव्हां पुनः एक प्रचंड सभा भरली. या सभेला येतांना सर्वांनीं आपापले काढलेले परवाने जाळण्यासाठीं आणावे असें गांधींनीं आवाहन केलें होतें. सभेला हजारो लोक जमले होते.

गांधींनीं लोकांना सांगितलें, " ज्यांनीं आपले काढलेले परवाने जाळण्याकरितां आमच्याकडे दिले आहेत त्यांच्यापैकीं कुणाला अजूनहि ते परत घ्यायचे असतील तर घ्यावेत. परवाने जाळायचे ते एवढ्याकरितांच, कीं आम्ही खुनी कायद्याला शरण जाणार नाहीं असें आपल्याला दाखवून द्यायचं आहे. परवाने काढणं हें जसं खुषीचं होतं तसंच हेंहि काम खुषीचं आहे. जमातीची कोणावर सक्ति नाहीं. मात्र आज लोकांच्या भीतीनं तो परवाना जाळायला द्यायचा आणि उद्यां लगेच सरकारच्या भीतीनं तो पुनः काढायचा यांत नामुष्की आहे. आणि जमातीचं नुकसान आहे..."

गांधींचें भाषण चालू असतांनाच सभेंतून एकसारखे आवाज निघत होते,— " आम्हांला परवाने नकोत; त्यांची होळी करा " आणि भराभर व्यासपीठाकडे परवान्यांची रीघ लागली.

शेवटीं गांधींनीं ' कोणाची या गोष्टीला हरकत आहे का ? असा सभेला प्रश्न टाकला. कोणी पुढें आलें नाहीं. पण एक धिप्पाड माणूस संथ पावलें टाकीत सभामंचाकडे आला. तो मीर आलम होता. तो बोलला :

" भाईयों,

मेरे हाथोंसे एक गलत काम हुआ था उसकी माफी माँगने के लिये मैं खडा हूँ। गांधीभाईको हमने पहचाना नहीं ! वो तो फरिश्ता हैं। हमने उनको पीटा-मारा, वह हमने खुदाका गुनाह किया ! खुदाताला हमको माफी बक्षे ! आप सब बिरादरोंसे और गांधीभाई से मैं तहे दिलसे माफी माँगता हूँ और उनसे अर्ज करता हूँ कि वे हमपर खफा न हो। और जाहीर करता हूँ

कि हमने कभी नया परवाना निकालाही नहीं था बल्के अब हमारा असली परवाना भी हम जला देने के लिये गांधीभाई के पास देते हैं ! ”

आणि मीर आलमनें आपला मूळचा परवाना होळींत टाकण्यासाठीं गांधींच्या हातीं दिला ! गांधींना अतिशय आनंद झाला; आणि त्या भरांत त्यांनीं मीर आलमचा हात हातीं घेऊन दाबला आणि म्हटलें, “ तुम्हारे उपर नाराज होने की बात ही नहीं थी, भाई ! ”

आणि मीर आलमचा परवाना परवान्यांच्या ढिगांत टाकून गांधींनीं त्या ढिगाला काडी लावली. लोकांनीं उत्साहभरानें जयघोष केले. गांधींना आपल्या या सत्याग्रहाचें सामर्थ्य प्रत्ययाला आलें.

# अलौकिक गुरु-शिष्य

: ११ :

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचा गांधींच्या सत्याग्रहाच्या लढ्याला पहिल्यापासून पाठिंबा होता. गोखल्यांच्यावर गांधींची निःसीम भक्ति होती. हिंदुस्थानांत स्थायी होण्याचें गांधींनीं मध्यंतरीं ठरविलें असतां ते मुंबईला बिऱ्हाड करून राहिले होते तें मुख्यतः गोखल्यांकरितांच. त्यांच्या हाताखालीं देशसेवेचें काम आपल्याला करायला मिळावें आणि स्वराज्य मिळविण्याला आपला यत्किंचित हातभार लागावा अशी त्यांची तळमळ होती. दक्षिण आफ्रिकेंत आल्यानंतर तिथल्या सर्व परिस्थितीची आणि ताज्या हालचालींची खबर ते नित्य-गोखल्यांना कळवीत असत. गोखल्यांच्या कर्तृत्वाविषयीं, नेतृत्वाविषयीं आणि कार्यपद्धतीविषयीं गांधींना विलक्षण विश्वास वाटत असे. ट्रान्सवालला गोखल्यांनीं यावें आणि इथल्या चळवळीचीं सूत्रें स्वतःकडे घ्यावींत आणि आपण त्यांच्या हाताखालीं स्वयंसेवक म्हणून निश्चित मनानें काम करावें असें गांधींना फार वाटे आणि तसें ते आग्रहपूर्वक त्यांना लिहीतहि. अर्थात तें गोखल्यांना शक्य नव्हतें. पण गांधींच्या आग्रहाला वश होऊन आणि दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांची स्थिति प्रत्यक्ष दृष्टीखाली घालून तेथील सत्ताधाऱ्यांशीं त्याबाबतींत बोलतां आलें तर बोलावें म्हणून गोखल्यांनीं १९१२ च्या ऑक्टोबर महिन्यांत दक्षिण आफ्रिकेंत आपण येत असल्याचें गांधींना कळविलें. हा त्यांचा दौरा सहा आठवडे व्हायचा होता.

गांधींचा आनंद गगनांत मावेना. आपला गुरु—आपलें प्रिय दैवत—आपल्या साहाय्याला धांवून येत आहे असें त्यांना वाटलें. केप टाउन या राजधानीच्या गांवीं बादशहाला शोभेल अशा थाटाचें त्यांचें स्वागत करण्याचें त्यांनीं ठरविलें.

हिंदी जमातींत उत्साहाचें भरतें आलें आणि जिकडे तिकडे त्यांच्या स्वागताची प्रचंड तयारी स्वयंस्फूर्तीनें हिंदी लोकांनीं केली. कित्येक ठिकाणीं गोरेहि त्यांत सामील झाले.

या दौऱ्यांत गोखल्यांची सगळी व्यक्तिगत सेवा आणि व्यवस्था गांधींनीं स्वतःकडे घेतली होती. गोखल्यांची प्रकृति नाजूक होती, त्यांच्या खाण्यापिण्याचीं पथ्यें संभाळणें, प्रवासांत त्यांना त्रास न होईल अशी व्यवस्था आणि कार्य-क्रम आंखणें, जेथें जावयाचें तेथील परिस्थिति काय आहे, तेथील पुढारी कोण आहेत, त्यांचीं मतें काय आहेत वगैरे सर्व माहिती त्यांना चोखपणें अगाऊ पुरविणें, ठिकठिकाणच्या आपल्या हिंदी सहकारी कार्यकर्त्यांची पूर्ण ओळख करून देणें, ज्या बैठकींना गोखल्यांनीं हजर रहावयाचें त्या बैठकींत त्यांनीं काय मांडावयाचें आहे त्याचे मुद्दे त्यांना टिपून देणें येथपासून तों थेट त्यांचे कपडे धुऊन इस्त्री करून ठेवणें, त्यांचें खाणें तयार करून त्यांना वेळेवर देणें आणि त्यांच्या हांकेला तयार असणें येथपर्यंत सर्व कामें गांधींनीं केवळ स्वतः-कडे ठेवलीं होतीं. त्यांच्या मदतीला मि. कॅलनबॅक नांवाचे त्यांचे एक गोरे परममित्र असायचे. ते तर गांधींचे आणि गोखल्यांचे दोघांचेहि भक्त.

गोखल्यांना गांधींच्या आपल्यावरील निःसीम प्रेमाची पूर्ण जाणीव होती. त्यांनींहि लहान मुलाप्रमाणें स्वतःला सर्वस्वी गांधींच्या स्वाधीन केलें होतें. ते देतील तें ते खायचे, नेतील तिकडे जायचे, ठेवतील तिथें अन् तसें राहायचे. त्या उभयतांत दूरपणा मुळीं राहिलाच नव्हता, ते एकमेकांत हृदयानें विरून गेले होते. गोखले गमती गमती करायचे. वाचतां वाचतां गोखले एकदम ओरडायचे :

" अरे, माझा धोबी कुठं गेला ? "

जवळच्याच खोलींतून गांधी धांवत धांवत यायचे न् म्हणायचे, " काय साहेब ! काय काम आहे ? "

" काम काय विचारतां ? हा माझा शर्ट किती घाण झालाय्, दिसत नाहीं ? असाच मीं घालायचा ? "

" छेः छेः, साहेब, आणतों, मी धुऊन देतों " आणि तो शर्ट घेऊन जाऊन गांधी धुऊन, इस्त्री करून ठेवायचे.

थोड्या वेळानें पुनः गोखल्यांची हांक— " कुठं रे गेला माझं अंथरुण घालणारा माणूस ? ही चादर किती विस्कटली आहे ? असंच अंथरुण घालतात काय ? "

गांधीजी येऊन लगेच चादर नीट घालून जायचे.

अशा रीतीनें दिवसांतून अनेक वेळां गोखले ' माझा नोकर;' ' माझा धोबी ' ' माझा हजाम ', ' माझा भंगी ', ' माझा डॉक्टर ' वगैरे संबोधनें वापरून गांधींना बोलवायचे आणि गांधी हर्षभरानें हजर व्हायचे. गोखल्यांना माहीत होतें, कीं गांधीला आपलीं हीं कामें करण्यांत अपार आनंद मिळतो, म्हणून मुद्दाम ते अशा गमती करीत. गांधींचें प्रत्येक काम चोख असे, तें त्यांना आवडेहि.

एकदां गोखल्यांना त्यांच्या सन्मानार्थ बोलावलेल्या एका पार्टीला जायचें होतें. अशा वेळीं ते त्यांचे गुरु न्या. रानडे यांनीं त्यांना भेट म्हणून दिलेलें उपरणें खास वापरीत. त्या उपरण्याला अर्थातच ते फार जपत. त्या दिवशीं तें थोडें मळल्यासारखें दिसत होतें, म्हणून त्यांनीं गांधींना बोलावून चांगल्या धोब्याकडून तें धुऊन आणायला सांगितलें. गांधी म्हणाले, " चांगला धोबी मीच आहें, मी तें उत्तम धुऊन देतों. "

" हां हां, महाराज, आपला हात याच्यावर नका चालवूं. याला जरा जरी धक्का लागला किंवा डाग पडला तर मला अतिशय दुःख होईल "

" पण आपण पाहा तर खरं आपल्या मनाजोगं काम मी करून देतों कीं, नाहीं तें. "

आणि गोखल्यांची साशंक संमति मिळवून गांधींनीं तें उपरणें दुधासारखें स्वच्छ करून आणि उत्कृष्ट घडी करून त्यांच्या हातीं ठेवलें. गोखल्यांनीं प्रसन्न दृष्टीनें त्यांच्याकडे पाहिलें; तें उपरणें धुतांना अन् त्यावर इस्त्री फिरवतांना गांधींनीं केवढी एकाग्रता आणि केवढी भक्ति चित्तांत बाळगली असेल !

प्रिटोरियांत असतांना गोखल्यांची तब्येत थोडी बिघडल्यामुळें गांधींनीं त्यांना फक्त फलाहारावरच ठेवलें होतें. फळें देतांनासुद्धां मोजून जोखून द्यायचे. पण गोखल्यांची भूक अशा फळांनीं थोडीच भागणार ? मग ते गांधींवर रागाचा आव आणून म्हणायचे, " इतके तुम्ही कृतघ्न असाल असं नव्हतं वाटलं मला. कलकत्याच्या कॉंग्रेसला तुम्ही आलां होता तेव्हां मी तुमची केवढी बरदास्त

ठेवली होती, तें विसरलां वाटतं? एक महिनाभर पक्वान्नंच पक्वान्नं खायला घातलीं होतीं कीं नाहीं? आतां इथं मी तुमचा पाहुणा म्हणून आलों तर मिनत्या करूनसुद्धां दोन फळं, अडीच बेदाणे असे मोजून तोलून देतां अन् मला उपाशी मारतां? आणि वर पुनः सेवावृत्तीचा न साधूपणाचा आव!"

"पण मी कुठं आपल्याला नको म्हणतों? वाटेल तेवढीं खा ना!"

"अं हं, तुम्हांला द्यायचीं असलीं तर द्या, मी काय म्हणून घेईन!"

आणि मग गांधी त्यांचा हट्ट पुरवायचे.

एकदां जोहानिसबर्गमध्यें गोखल्यांना मेजवानी होती. पुष्कळ मोठीं मोठीं माणसें मेजवानीला बोलावलीं होतीं. गोखल्यांचें मुख्य भाषण तेथेंच व्हायचें होतें. मेजवानीला विविध प्रकारचे खाद्यपदार्थ तयार करण्यांत आले होते. सर्व पदार्थ निरामिष होते.

त्या दिवशीं सकाळीं गोखल्यांनीं गांधींना विचारलें, "काय गांधी, आज तरी मला सगळं खाण्याची परवानगी आहे ना?"

गांधी :– "काय म्हणून?"

गोखले :– "आज मेजवानी आहे ना?"

गांधी :– "म्हणून काय झालं?"

गोखले :– "काय झालं? माझ्याकरितां मेजवानी, मेजवानींत अनेक स्वादिष्ट पदार्थ असणार, आणि मी मात्र ते खायचे नाहींत, ही रीत झाली? आज तुम्ही मला परवानगी दिलीच पाहिजे."

गांधी :– "मी कांहीं परवानगी देणार नाहीं, आपल्याला खायचे तर खा."

गोखले :– "बरं आहे, कशी परवानगी देत नाहीं तें पहातों!"

संध्याकाळीं पांच वाजण्याची वेळ झाली. मोटार येऊन दारांत उभी राहिली. गांधी गोखल्यांच्यापाशीं गेले. ते आपले खुशाल वाचीत पडले होते.

गांधी म्हणाले, "मोटार आली आहे."

"कुठं जायचं आहे?"

"मेजवानीची वेळ झाली"

"मला नाहीं यायचं. तुम्ही सगळे जा."

गांधींनीं जाणलें कीं हा सकाळचा राग आहे, तरी ते म्हणाले, "म्हणजे? आपल्याशिवाय आम्ही तिथं जाऊन काय करणार?"

" पुष्कळ वृद्धाड नवरदेवाशिवाय जात असतील, तसे तुम्ही सुद्धां जा."

गांधी थोडा वेळ गप्प राहिले. मग म्हणाले, " उशीर होतोय्."

" झाला तर झाला. तिथें जाऊन माझ्या मनाला येईल तें खाण्याची परवानगी मिळाल्याशिवाय मी इथून हलणार नाहीं."

पांच तर तेथेंच वाजले. पण गोखले जणू कांहींच घाई नाहीं असे स्वस्थ होते. शेवटीं गांधी हरले. म्हणाले, " उठा आतां, कपडे करा. आपल्या इच्छेला येईल तें खाण्याची माझी परवानगी आहे."

" परवानगी आहे ? " एखाद्या लहान मुलाप्रमाणें गोखल्यांनीं हर्षोत्फुल्ल होऊन विचारलें.

" होय, होय, परवानगी आहे. उठा आतां."

" हां, आतां उठेन. तुम्ही मोठे सत्याग्रही ना ? विरुद्ध सत्याग्रह केला तरच तुम्ही हरणार. बघितलात माझा सत्याग्रह ? कबूल करा मी हरलों म्हणून ! "

आणि गांधींनीं या प्रेममूर्तीपुढें हरल्याची कबुली दिली.

प्रेममूर्ति कोण, गोखले कीं गांधी ? खुद्द गोखले गांधींना एकदां म्हणाले होते,

" गांधी, तुम्ही अत्यंत जुलमी आहांत. दुसऱ्या माणसावर प्रेमाची अशी मोहिनी टाकतां कीं तो बिचारा तुमच्या इच्छेनुसार वागायला जातो, तुम्हांला खूष करूं पहातो आणि स्वतःची जीवापाड ओढाताण करून घेतो. माझी प्रकृति कितीहि अस्वस्थ असली, कितीहि अगत्याच्या कामांत मी गुंतलों असलों तरी तुमचं काम म्हटलं कीं मी सारं भान विसरून त्याच्याच मागं लागतों..."

गांधींच्या आग्रहाला वश होऊन दक्षिण आफ्रिकेंतल्या हिंदी लोकांसमोर गोखल्यांनीं सर्व भाषणें मराठींत केलीं आणि गांधींनीं आपल्या हिंदींत त्याचा तर्जुमा करून लोकांना सांगितला.

गोखल्यांनीं दक्षिण आफ्रिकेच्या राज्यकर्त्यांशीं हिंदी लोकांच्या अडचणीसंबंधीं बोलणीं केलीं, आणि पंतप्रधान जनरल स्मट्स यांनीं गोखल्यांना वचन दिलें कीं हिंदी लोकांवर लादलेला ३ पौंडांचा कर आपण काढून टाकूं आणि एशियाटिक कायदा ( ' खुनी कायदा ' ) रद्द करूं; पण दुर्दैवाची गोष्ट, पुढें हें वचन त्यांनीं पाळलें नाहीं. गांधींनीं पुनः सत्याग्रहाचा लढा सुरू केला त्याला, आपल्या गुरूचा सरकारनें केलेला विश्वासघात हेंहि एक जबरदस्त कारण होतें.

● ● ●

१२८१२

# निर्भय गांधी, निर्भय जनता : १२ :

गांधी हिंदुस्थानांत परत आल्यानंतर तीन वर्षांनीं घडलेली घटना.

जनकराजाची भूमि चम्पारण्य. तेथें जशीं आंब्याचीं वनें आहेत तशीं एके काळीं, म्हणजे १९१७ पर्यंत सगळीकडे निळीचीं शेतें होतीं. म्हणजे आपल्या पांढऱ्या कपड्यांना खुलविणारा नीळ ज्यापासून तयार होतो ती वनस्पति. चंपारण्याचा भाग म्हणजे नेपाळच्या सीमेला लागलेला हिमालयाच्या पायथ्यालगतचा बिहार प्रांताचा भाग. येथील बहुतांश प्रजा सुधारलेल्या जगापासून फार दूर—मागासलेली. गोऱ्या भांडवलवाल्यांनीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश राजवटीच्या साहाय्यानें तेथील गरीब शेतकऱ्यांवर फार काळपासून जुलूम सुरू केला होता. निळीला भाव चांगला येतो हें पाहून त्यांनीं निळीचें उत्पादन वाढविण्याची या शेतकऱ्यांवर सक्ती करायला लावली होती. शेतकऱ्यानें स्वतःच्याच जमिनीच्या $\frac{३}{२०}$ भागांत निळीची लागवड केलीच पाहिजे असा कायदा येथें केला गेला. या पद्धतीला 'तीन कठिया' म्हणत. २० कठ्ठे म्हणजे एक एकर आणि या २० कठ्ठ्यांपैकीं तीन कठ्ठे जमिनीवर निळीची लावगड करण्याची सक्ती म्हणून तिला 'तीन कठियाची पद्धति' म्हणत असत. या पद्धतीखालीं जवळ जवळ १०० वर्षें ही दीनदुबळी आणि मुकी प्रजा चिरडली जात होती. ज्या कांहीं शेतकऱ्यांनीं या पद्धतीविरुद्ध बंड करण्याचें धाडस केलें त्यांच्यावर सरकारनें आणि निळीच्या गोऱ्या मळेवाल्यांनीं जबरदस्त जुलूम करून त्यांना दडपून टाकलें. दीर्घकाळपर्यंत या प्रजेचा आवाज बाहेरच्या जगांत उमटला नाहीं, तिला कुणी त्राता भेटला नाहीं, बिहारांतील कांहीं गरीबांचे कैवारी, देशभक्त वकील—बॅरिस्टर या शेतकऱ्यांच्या स्थानिक तक्रारी कोर्टांत नेत; पण मूळ रोग नाहींसा न झाल्या-

मुळें अशा तक्रारी कायमच्या कशा नाहींशा होणार ? शिवाय वकील, 'देशभक्त' असले तरी ते आपल्या अशिलांकडून फी भरभक्कम घेतल्यावांचून रहातच नसत ! कित्येक वेळां दहा दहा हजार रुपये फी घेतली जात असे ! !

पण दीन-दुबळ्यांचा वाली खरोखर ईश्वर आहे. राजकुमार शुक्ल या नांवाचा याच भागांतला एक गांजलेला पण मोठ्या मोठ्या देशभक्तांच्या सहवासांत आलेला एक शेतकरी आपल्या बांधवांचें हें गाऱ्हाणें कुठल्या वेशीवर टांगलें असतां जगाचें तिकडे लक्ष वेधेल या प्रयत्नांत लखनौ कॉंग्रेसला आपल्या 'वकील बाबू' बरोबर गेला होता. हे वकीलबाबू म्हणजे बिहारप्रांतांत सुप्रसिद्ध असलेले ब्रजकिशोर बाबू. राजकुमार शुक्लांनीं कॉंग्रेसच्या प्रतिनिधि-निवासांत महात्मा गांधींचें नांव ऐकलें, त्यांच्या आफ्रिकेंतील पराक्रमाची कथाहि अनेकांच्या तोंडून ऐकली. त्यांना वाटलें असावें कीं अन्यायाशीं प्रत्यक्ष झुंज देण्याची तयारी असणाराच आपल्याला वांचवूं शकेल. म. गांधींविषयीं त्यांना आशा उत्पन्न झाली. वकीलबाबूंना घेऊन शुक्ल महात्माजींकडे गेले. महात्माजींनीं त्यांची हकीकत ऐकून घेतली, पण प्रत्यक्ष प्रकार पाहिल्यावांचून आपण या बाबतींत सल्ला देऊं शकणार नाहीं असें त्यांना वाटलें आणि तसें त्यांनीं सांगितलें.

पण शुक्लांनीं एकदां मनांत घेतलें तें सोडलें नाहीं. १९१७ सालाच्या आरंभीं म. गांधी कांहीं कामानिमित्त कलकत्त्याला गेले तेव्हां त्यांनीं तिसऱ्यांदा त्यांची भेट घेतली. या गृहस्थाची चिकाटी बघून म. गांधींनीं त्यांच्यासह चंपारण्यांकडे जाण्याचें ठरविलें.

प्रथम पाटण्याहून ते दोघे मुझफ्फरपुरला गेले. तेथें आचार्य कृपलानींनीं त्यांचें स्वागत केलें. महात्माजींनीं कृपलानींकडून आणि जमलेल्या वकील मंडळींकडून सर्व वस्तुस्थिति शांतपणें समजावून घेतली. कोर्टांत या वकिलांनीं जे दोन खटले चालविले होते त्यांचेहि कागद म. गांधींना दाखविण्यांत आले. त्यावरून म. गांधींना तेथील परिस्थितीची पुरती कल्पना आली. म. गांधी या मंडळींना म्हणाले, "खटले-बिटले आतां आपण तहकूबच केले पाहिजेत. खटले करून पदरांत फारसं कांहींच पडत नाहीं. जिथं रयत इतकी चिरडली गेली आहे, जिथं प्रत्येक जण भयभीत अवस्थेंत वावरत आहे, तिथं सरकारी कोर्टांमार्फत इलाज बहुश: कांहीं होत नसतो. खरं औषध म्हणजे लोकांच्या

मनांत जी भीति दाटली आहे ती नाहींशी करून लोकांना निर्भय व्हायला शिकवलं पाहिजे. ही तीनकठियाची प्रथा नाहींशी होत नाहीं तोंवर आपण कुणीहि स्वस्थ बसायचं नाहीं असा निश्चय केला पाहिजे. मी फक्त दोन दिवसांत पहातां येईल तेवढं पहायला म्हणून आलों आहें पण मला दिसतंय् कीं कदाचित् दोन वर्षं सुद्धां हें काम घेईल, हरकत नाहीं. मी तितका काळ द्यायलाहि तयार आहें, या बाबतींत काय करायला पाहिजे तेंहि मला सुचतं, पण तुम्हां मंडळींची मदत मला लागेल."

"आम्ही तर लागेल ती मदत आपल्याला द्यायला तयार आहोंत. पण मदत कशा प्रकारची तें सांगा." ब्रजकिशोरबाबू म्हणाले. आणि चर्चेत सारी रात्र गेली. महात्माजींनीं त्यांना सांगितलें, "तुमच्या वकिलीच्या बुद्धीचा येथें फारसा उपयोग नाहीं. जे जे लोक जुलमानं गांजले आहेत त्यांचे जाबजबाब आपल्याला लिहून घ्यायचे आहेत. त्यांत दुभाषी म्हणून अन् कारकून म्हणून तुम्ही आपला उपयोग करूं दिला पाहिजे. कारण इथली हिंदी बोली मला समजत नाहीं. कागदपत्रें कैथी भाषेंत किंवा उर्दूत लिहिलेलीं. त्यांचं भाषांतर तुम्ही मला करून दिलं पाहिजे.

"तें सर्व आम्ही करूं" वकील मंडळींनीं आश्वासन दिलें.

"आणि..." महात्माजी थांबले.

"आणि काय ?"

"आणि तुरुंगांत जावं लागलं तर तीहि तुमची तयारी असली पाहिजे."

वकील मंडळी स्तब्ध झाली. मग ब्रजकिशोर बाबू म्हणाले, "आम्ही इतके जण जें कांहीं काम आपण सोपवाल तें करायला तयार आहोंत. आमच्यापैकी जितक्यांना आपण ज्या वेळीं बोलवाल तितके जण त्या वेळीं आपल्यापाशीं येऊन रहातील. पण तुरुंगाची गोष्ट नवीन आहे. त्यासंबंधीं विचार केला पाहिजे."

"ठीक आहे. तुम्ही विचार करा. मी कामाला लागतों. तुमचा निर्णय मला नंतर सांगा." म. गांधी म्हणाले, आणि ते कामाला लागले.

निळीच्या कारखान्यांच्या मालकांविरुद्ध ज्या तक्रारी होत्या त्यांत कितपत तथ्य आहे हें पहाण्याकरितां हजारो शेतकऱ्यांच्या गांठीभेटी घेणें आणि त्यांची हकीकत ऐकणें अवश्य होतें. पण जशी ही बाजू तशी दुसरीहि बाजू कळणें

सत्यशोधनाच्या दृष्टीनें आवश्यक होतेंच. म्हणून म. गांधींनीं कारखानदारांना आणि तिरहुत विभागाच्या कमिशनरला दोघांना पत्रें लिहिलीं. कारखानदारांनीं आपल्या असोसिएशनच्या सेक्रेटरीला भेटा म्हणून कळविलें. त्याप्रमाणें म. गांधींनीं त्या गोऱ्या इंग्रज सेक्रेटरीची भेट घेतली. पण तो म्हणाला, " हें पहा मि. गांधी, तुम्ही आहांत परदेशी. तुम्ही आमच्या अन् आमच्या शेतकऱ्यांच्या मध्यें पडूं नका. अर्थात् तुम्हांला कांहीं सांगायचं असलं तर मला तुम्ही पत्रानं कळवूं शकतां. "

या गोऱ्या माणसानं आपल्याला 'परदेशी' म्हटलेलं ऐकून म. गांधींना राग आला नाहीं, हंसू आलें. त्यांनीं त्याला सांगितलें, " मी परदेशी नाहीं. या शेतकऱ्यांच्या देशाचाच आहे, आणि त्यांची इच्छा असली तर त्यांच्या स्थितीची चौकशी करण्याचा मला पूर्ण अधिकार आहे. "

म. गांधी कमिशनरसाहेबांना भेटले. त्यांनीं तर गांधींना धमकावयालाच सुरुवात केली आणि " तुम्ही कोण, हा भाग सोडून तुम्ही ताबडतोब निघून जा " असें बजावलें.

म. गांधींच्या कामाला अशी सुरुवात झाली. आपल्या सहकाऱ्यांना या दोन्ही हकीकती सांगून गांधी म्हणाले कीं, " मला वाटतं कीं आपल्याला चौकशी करायला सरकार आपण मानतों त्यापेक्षां लवकर अडथळा आणील आणि तुरुंगांत जाण्याची वेळ लवकरच येईल. तेव्हां पकडून घ्यायचं असेल तर तें चंपारण्यांतल्या मोतीहारी किंवा बेतिया या मुख्य ठिकाणींच पकडून घेतलेलं बरं. म्हणून मला तिकडं लवकर पोंचलं पाहिजे. "

राजकुमार शुक्लांना घेऊन त्याच दिवशीं म. गांधी मोतीहारी या जिल्ह्याच्या मुख्य शहरीं जायला निघाले. तेथें ते पोंचतात न पोंचतात तोंच त्यांच्या कानां-वर आलें कीं पांच मैलांवर असलेल्या एका गांवीं एकां शेतकऱ्यावर कारखान-दाराकडून अत्याचार झाला आहे. म. गांधींनीं दुसरे दिवशीं सकाळीं त्या गांवीं जाण्याचें ठरविलें.

दुसरे दिवशीं सकाळीं हत्तीवर बसून महात्माजी आणि त्यांचे सहकारी त्या गांवाकडे निघाले. तिकडे हत्तींचा वापर आपल्या इकडच्या बैलगाडीसारखा करतात. अडीच तीन मैल ते गेले असतील; इतक्यांत पोलिस सुपरिंटेंडेंटचा निरोप घेऊन एक माणूस गाडी घेऊन आला. सुपरिंटेंडेंटनें म. गांधींना बोला-

वलें होतें. महात्माजींनीं तें निमंत्रण स्वीकारलें आणि त्या माणसानें आणलेल्या गाडींत ते बसले. त्यांनीं आपल्या बरोबरच्या सहकाऱ्यांना मात्र पुढें जाऊन चौकशी पूर्ण करून येण्यास सांगितलें.

म. गांधींना घेऊन जाणाऱ्या माणसानें त्यांच्यावर चंपारण्य सोडून निघून जाण्याचा हुकूम बजावला. हुकुमाच्या नोटिशीवर त्यानें म. गांधींची सही मागितली. म. गांधींनीं सही देतांना लिहिलें कीं चंपारण्य सोडून जाण्याची माझी इच्छा नाहीं, मी ठरल्याप्रमाणें पुढें जाऊन चौकशी करणार आहें.

अर्थात् हुकुमाचा भंग केल्याबद्दल दुसऱ्याच दिवशीं कोर्टांत हजर रहाण्याचें समन्स त्यांना मिळालें.

म. गांधी सारी रात्र जागले; सर्व हकीकत थोडक्यांत ज्या व्यक्तींना, पुढाऱ्यांना व वृत्तपत्रांना कळविणें अवश्य वाटलें त्या सर्वांना त्यांनीं पत्रें लिहून टाकलीं. आणि आपल्याला पकडलें तर पुढें काय करायचें यासंबंधीं सूचनाहि ब्रजकिशोर बाबूंना दिल्या.

म. गांधींच्यावर समन्स बजावलें ही बातमी सबंध मोतीहारी शहरभर लगेच पसरली. सकाळीं लोकांचे थवेच्या थवे महात्माजी उतरले होते त्या घराच्या आसपास जमूं लागले. म. गांधी कचेरीकडे निघाले तेव्हांहि त्यांच्याभोंवतीं खूप गर्दी झाली. कचेरींत गांधींचें आपल्याशीं अत्यंत सभ्यतेचें व सौजन्यपूर्ण पण निर्भय वागणें पाहून कलेक्टर, मॅजिस्ट्रेट, पोलिस अधिकारी यांना अचंबा वाटला. त्यांना हा अनुभव नवा होता. गांधीजींनीं त्यांच्या नोटिशींना वगैरे विरोध मुळींच केला नाहीं, त्यामुळें या माणसाविषयीं त्यांच्या अंतःकरणांत न कळत एक सद्भाव निर्माण झाला. लोकांची अफाट गर्दी उसळली होती. अधिकाऱ्यांना आवरत नव्हती, ती काबूंत ठेवण्याच्या कामीं त्यांना गांधींजींची आणि त्यांच्या सहकाऱ्यांची मदत घ्यावी लागली. ही मदत घेणें त्यांना भाग पडलें यांतच आपली आतांपर्यंतची सत्ता संपुष्टांत आली हें ते समजून चुकले. सरकारी अधिकाऱ्यांना लोक आजवर भ्यायचे, दबकून असायचे ते आज त्यांच्यापुढें मान ताठ करून आणि न दबतां चालत होते. ते निर्भय झाले होते. त्यांना हा दिवस जणू उत्सवाचाच वाटत होता.

म. गांधींच्यावर खटला चालला. खटला चालविणारा सरकारी वकील आणि ज्याच्यापुढें खटला चालला तो मॅजिस्ट्रेट दोघेहि बावरल्यासारखे झाले होते.

महात्माजींनीं आपल्या लहानशा निवेदनांत, आपण येथें फक्त परिस्थितीची पहाणी आणि अभ्यास करण्याकरितां आलों आहों त्या कामीं शक्य तर सरकारची आणि मळेवाल्यांचीसुद्धां मदत इच्छित आहों, दुसरा कोणताहि उद्देश आपल्या मनांत नाहीं, आपण आल्यानें लोक शांतीचा भंग करतील असें आपल्याला वाटत नाहीं, कायद्याचें महत्त्व जाणणाऱ्या आपल्यासारख्याला सरकारी हुकूम मोडण्याची इच्छा असणें शक्य नाहीं, पण तो मोडला नाहीं तर कर्तव्यच्युति होईल असें आपल्याला वाटतें, म्हणून आपण स्वेच्छेनें चंपारण्य सोडून जाणार नाहीं, असें सांगितलें. गुन्हा कबूल केल्यामुळें कोर्टानें आतां शिक्षाच फक्त द्यायची होती. पण मॅजिस्ट्रेटनें खटला त्या दिवशीं तहकूब ठेवला. पुढें दोन दिवसांनीं गव्हर्नराच्या हुकुमानें तो मागें घेण्यांत आला. कलेक्टराचें म. गांधींना पत्र आलें कीं तुम्हांला जी काय चौकशी करायची असेल ती करा, अधिकाऱ्यांची जी मदत घ्यायची असेल ती घ्या. हा म. गांधींच्या सत्याग्रहाचा विजय होता. मळेवाल्यांचा पराजय होता. म. गांधींना त्यामुळें सगळीकडे खूप प्रसिद्धी मिळाली. लोकांत आनंदीआनंद पसरला. गोरे मळेवाले मात्र खूप चिडले.

शेतकऱ्यांचे जबाब घेण्याचें काम अनेक लहानमोठ्या स्वयंसेवकांच्या साहाय्यानें पद्धतशीरपणें चाललें. त्याबरोबरच ज्या ज्या खेड्यांशीं महात्माजींचा संबंध आला त्या त्या खेड्यांत लोकांचें अस्ताव्यस्त, गलिच्छ जीवन सुधारण्याचा, त्यांच्या उपयोगी पडण्याचा, त्यांचें आरोग्य सुधारण्याचा आणि त्यांना प्राथमिक शिक्षण देण्याचा उपक्रमहि गांधींनीं सुरू केला. या कामीं त्यांनीं हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या प्रांतांतील स्वयंसेवकांची मागणी केली आणि मुख्यत्वें महाराष्ट्रांतून आणि गुजरातेंतून उत्तम स्वयंसेवक स्त्री-पुरुष मदतीला धांवून आले. गांधींनीं आपल्या सत्याग्रहाश्रमांतील कार्यकर्ते व आपली पत्नी कस्तुरबाई यांनाहि या कामीं लावलें आणि अशा रीतीनें सर्व बाजूंनीं त्यांनीं या लोकांची सेवा आरंभिली. त्यामुळें बिहारच्या लोकांना महात्माजी हे आपल्या भावाप्रमाणें वाटूं लागले.

एके दिवशीं महात्माजींना बिहार सरकारकडून पत्र आलें कीं तुमचें चौकशीचें काम फार लांबत चाललें आहे, तें बंद करून तुम्ही बिहार सोडला पाहिजे. गांधींनीं उत्तर लिहिलें, चौकशी आणखीहि लांबेल, आणि ती पूर्ण

झाल्यानंतर सुद्धां लोकांच्या दुःखाचें निवारण होणार नाहीं तोंवर बिहार मी सोडणार नाहीं.

बिहार सरकार नमलें. गव्हर्नरनें स्वतःच चौकशी कमिटी नेमली, त्यांत म. गांधींनाही घेतलें; गांधीहि आपलें स्वातंत्र्य कायम ठेवून या कमिटीचे सभासद झाले. चौकशी कमिटीनें शेतकऱ्यांच्या सर्व तक्रारी खऱ्या ठरविल्या; या कामीं म. गांधींनीं ज्या हजारों तक्रारी गोळा केल्या होत्या त्यांचाहि उपयोग झाला. गोऱ्या मळेवाल्यांनीं अन्यायानें जो पैसा रयतेकडून घेतला होता तो परत करावा आणि ‘ तीन कठिया ’ चा कायदा रद्द करावा अशी कमिटीनें शिफारस केली.

गोऱ्या मळेवाल्यांची सत्ता चंपारण्यांत आणि बिहार सरकारांत फार प्रबळ असतांना सुद्धां चौकशींतून बाहेर पडलेल्या गोष्टी सत्य असल्यामुळें त्या मान्य करणें गव्हर्नराला भागच पडलें आणि कमिटीच्या शिफारशींप्रमाणें मळेवाल्यांना शेतकऱ्यांचे पैसे परत करावे लागले.

‘ तीन कठिया ’ चा कायदा रद्द झाला अन पिढ्यान् पिढ्या राहिलेल्या गोऱ्या मळेवाल्यांना आपलें चंबूगबाळें तेथून हालवावें लागलें. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत मिळाल्या.

● ● ●

मराठी

" हो, अवश्य घेईन. सध्यां मी पैशाच्या अडचणींतच आहें. "

" बरं तर, मी उद्यां याच वेळीं येईन, तेव्हां तुम्ही आश्रमांत असावें, " आणि तो गृहस्थ निघून गेला.

दुसऱ्या दिवशीं ठरलेल्या वेळीं मोटारीचा हॉर्न वाजला. मुलांनीं गांधीजींना येऊन सांगितलें. ते शेटजी आश्रमांत गेले नाहींत. गाधीजींनाच त्यांनी बाहेर बोलावलें आणि १३००० रुपयांच्या नोटा त्यांच्या हातीं ठेवून ते चालते झाले ! हे गृहस्थ कोण, त्यांची गांधीजींना ओळख नव्हती, त्यांनीं आश्रमांत कधीं पाऊल टाकलें नव्हतें, आतांहि ते आले नाहींत, त्यांनीं आश्रमाच्या कामाबद्दल पूसतपासहि केला नाहीं, बाहेरच्या बाहेर आले आणि पैसे देऊन निघून गेले.

पौराणिक कथांत अशाच प्रसंगांवर चमत्काराचें लेणें चढविलेलें असतें. भक्ताची चिंता परमेश्वर साक्षात् कशी वाहतो याचें अद्‌भुत वर्णन कथा–कीर्तनांतून सांगितलें जातें. पण गांधीजींना आलेला हा अनुभव आधुनिक काळांतला चमत्कारच नव्हे काय ?

• • •

# नंगा फकीर

## : १४ :

१८५८ च्या प्रसिद्ध जाहीरनाम्यांत व्हिक्टोरिया राणीनें ब्रिटिश साम्राज्यांत सामील असलेल्या सर्व देशांतील एकूणएक नागरिकांना समान हक्क असल्याची जी घोषणा केली होती ती प्रामाणिक आहे असें मानून गांधींनीं दक्षिण आफ्रिकेंतील चळवळ केली होती आणि तिच्याच आधारावर हिंदुस्थानालाहि स्वराज्य मिळण्याची आशा राखली होती. साम्राज्य सरकारचीं तत्त्वें थोर आहेत, त्या तत्त्वांना हरताळ फासतात ते स्थानिक सत्ताधारी, अशी गांधींची प्रामाणिक समजूत ते हिंदुस्थानांत येऊन राहिले तरी १९१९ पर्यंत होती. त्या भावनेनेंच १९१६–१७ सालीं त्यांनीं पहिल्या महायुद्धांत ब्रिटिशांना मदत करण्याकरितां व्हॉइसरॉयांच्या विनंतीवरुन रिक्रूटभरती करण्याची जिवापाड मेहेनत केली, त्या कष्टांनीं ते अगदीं मरणपथारीवर पडले. परंतु हिंदुस्थानसरकारनें महायुद्ध संपल्यानंतरसुद्धां हिंदी लोकांना गरीब गाय करण्याकरितां आणि त्यांच्यांत जागृत झालेली राष्ट्रीय वृत्ति मारण्याकरितां रौलॅट कायद्यासारखे जुलमी कायदे केले आणि साम्राज्यसरकारकडे त्याविरुद्ध दाद मागितली तरी त्या सरकारनें ती दाद दिली नाहीं, उलट जालियांवाला बागेंत निरपराधी लोकांच्या झालेल्या कत्तलीवर हंटर कमिटी नेमून सफेती फिरविली आणि युद्धाच्या अंतीं झालेल्या तहांत हिंदी मुसलमानांच्या भावना दुखावतील अशा रीतीनें तुर्की खलिफाला पदच्युत केला, या घटनांनीं गांधींचा ब्रिटिश साम्राज्यावरील विश्वास उडाला आणि तशा आजारी अवस्थेंतहि ते सरकारशीं झुंजायला तयार झाले.

साऱ्या राष्ट्राला त्यांनीं असहकाराचा महामंत्र दिला. त्यांत सरकारी पदव्यांचा व नोकऱ्यांचा त्याग, सरकारी शाळा–कोर्टांवर बहिष्कार, परदेशी कपड्यांवर

बहिष्कार या प्रमुख गोष्टी होत्या. स्वतःला मिळालेलें कैसर-इ-हिंदचें पदक त्यांनीं सरकारकडे परत केलें त्याबरोबरच देशाला लागणारा कपडा देशांतल्या देशांत पुरेसा निर्माण करण्याचा म्हणजे ' स्वदेशी ' चा आणि हिंदु–मुसलमान-अस्पृश्यांचें म्हणजे जाती-जमातींचें ऐक्य साधण्याचा प्रयत्न करणें हाहि कार्यक्रम त्यांनी देशापुढें ठेवला होता. आपल्या स्वभावाप्रमाणें या सर्व गोष्टींत त्यांनीं सर्वस्वी आपलें लक्ष गुंतविलें होतें. आपल्या आश्रमांत त्यांनीं मोठ्या मेहेनतीनें शोधून आणून माग लावले होते. परंतु त्यावेळीं चरखा त्यांना सांपडला नव्हता, ती कलाहि त्यांना माहीत झाली नव्हती, म्हणून गिरणीचें सूत आणून या मागांवर विणलें जाई. तथापि गिरण्यांवर आपल्याला अवलंबून राहावें लागतें याचा विषाद त्यांच्या मनांत होताच.

त्यांच्या आश्रमांत गंगाबेन नांवाच्या एक त्यागी, कर्तबगार बाई होत्या. त्या खेडोपाडीं हिंडत, गरीबगुरीबांत मिसळत, अस्पृश्य म्हटलेल्या लोकांत सुद्धां जाऊन बसत आणि त्यांची सेवा करीत. त्यांना गुजरातच्या एका खेड्यांत चरखा आढळला, तो त्यांनीं आश्रमांत आणविला. त्यावर कातण्याचें शिक्षण घेतलें, आश्रमांतील सर्वजण जाडेंभरडें का होईना सूत कातूं लागले. तें विणण्याचा प्रयत्न झाला. गांधींना चरखा मिळतांच फार काळापासून आपल्याला जें हवें होतें तें मिळाल्याचा आनंद झाला. पुढें असे चरखे उत्तर हिंदुस्थानांत आणि पंजाबांत आणि दक्षिण हिंदुस्थानांतहि कुठें कुठें तुरळकपणें चालू असल्याचें त्यांना समजलें आणि मग १९२४ सालीं कॉंग्रेसअंतर्गत अखिल भारतीय चरखासंघाची स्थापना करून त्यांनीं खादी-उत्पादनाला फार मोठा उठाव दिला. खादी हीच खरी स्वदेशी अशी गांधींनीं घोषणा केली.

हिंदुस्थानच्या पराकाष्ठेच्या दारिद्र्याचें एक चित्र गांधींच्या मनावर फार खोलवर कोरलेलें होतें. चंपारण्यांत असतांना स्वच्छतेचा धडा ते तिथल्या खेड्यांतल्या लोकांना शिकवीत. एकदां एका झोपडीपाशीं ते थांबले. त्या झोपडीच्या दारांत एक बाई उभी होती आणि तिच्या अंगावरचीं वस्त्रें अतिशय गलिच्छ दिसत होतीं. गांधींनीं तिला ' रोज आंघोळ करावी, साडी स्वच्छ नेसावी ' असें सांगितलें. त्या बाईनें गांधींच्या बरोबर असलेल्या कस्तुरबाईंना आंत बोलावलें आणि त्यांना दाखविलें, " हें बघा, हें एकच पटकूर मला नेसायला आहे. मी आंघोळ करूं कशी अन् हें धुऊं कशी ? " कस्तुरबाईंनीं तें

गांधींना सांगतांच त्यांच्या अंतःकरणाला मोठा धक्का बसला. आपला देश किती दरिद्री आहे याचें यावेळीं त्यांना दर्शन झालें.

चरखा सांपडतांच तो अशा दरिद्री झोपड्यांत सुरू होईल, बायांना स्वतःचा पुरेसा कपडाहि मिळेल आणि मजुरीहि मिळेल, या विचारानें चरख्याकडे ते देशाचा त्राता म्हणून पाहूं लागले. रोज अर्धा तास स्वतः सूत काढल्यावांचून जेवायचें नाहीं असा त्यांनीं नियम घेतला.

पण पुरेशी खादी अजून देशांत निघूं लागली नव्हती. टिळक स्वराज्य फंडाचा विनियोग चरखे बनवून खादीचें उत्पादन वाढविण्याकडे केला जाऊं लागला तरी खादी वापरूं म्हणणाऱ्या लोकांनासुद्धां खादी मिळत नव्हती. गांधींनीं परदेशी कपड्यांची होळी करण्याचा कार्यक्रम ठिकठिकाणीं सुरू केला होता. या होळ्यांनीं लोकांच्या अंतःकरणांत ब्रिटिश राज्याबद्दल जो पराकाष्ठेचा संताप उसळत होता त्याला बाहेर पडण्याला त्यांनीं हा अहिंसक वाव दिला होता.

पण परदेशी कापडाऐवजीं लोकांनीं वापरायचें काय ? गिरणीकपडा स्वदेशी खरा पण त्यानें करोडों लोकांचें दारिद्र्य आणि बेकारी कशी दूर होणार ? त्यानें गिरणीवाल्यांचेंच उखळ पांढरें होणार म्हणून चरखा हीच हिंदुस्थानची संजीवनी आणि खादी हीच स्वदेशी हा मंत्र गांधी लोकांना सांगू लागले.

१९२१ च्या सप्टेंबर महिन्यांत मोपल्यांच्या बंडाच्या निमित्तानें, कॉंग्रेसचे अध्यक्ष मौलाना महमदअली यांच्याबरोबर गांधी मलबारकडे निघाले होते. पण वाटेंतच सरकारनें महमदअलींना पकडलें. याला उत्तर म्हणून लोकांनीं परदेशी कापडावर सप्टेंबर ३० तारखेपर्यंत संपूर्ण बहिष्कार टाकावा, सविनय कायदेभंगाचा तो शुभारंभ होईल असें गांधींनीं लोकांना आवाहन केलें.

एका सभेंत गांधींना प्रश्न विचारण्यांत आला कीं तुम्ही परदेशी कपडा टाकून देऊन खादी वापरायला सांगतां, पण खादी पुरेशी मिळत नाहीं, पुरेशी मिळूं लागण्याला फार काळ जावा लागणार आहे, तर आम्ही काय करावें ?

गांधींना त्या प्रश्नांतली निवड जाणवली. याला उत्तर काय ? उत्तर काय खादी पुरती निघेपर्यंत इतर कपडा वापरावा हें होऊं शकेल ? यांत राष्ट्राचा व्रतभंग आहे. आणि व्रतभंग म्हणजे तेजोभंग. खादीच वापरायची, कारण तीच खरी स्वदेशी आहे. तर मग ती जेवढी मिळेल तेवढ्यांतच भाग-वायचें हें आपण स्वतः करून दाखविलें पाहिजे, असा गांधींनीं त्या क्षणींच

विचार करून आपले सहकारी उमर सोबानी यांना तो सांगितला. त्यांनाहि तो पटला. गांधींनीं सभेंत लगेच जाहीर केलें कीं "देशाच्या या आणीबाणीच्या काळांत कमींत कमी कपड्यांनिशीं कसें भागवितां येतें हें स्वतःच्याच आचरणानें दाखविण्याकरितां मी आजपासून माझ्या कपड्यांचा त्याग करीत आहें. मी एका वेळीं फक्त एक पंचा व अवश्य तर एक उपरणें घालूनच यापुढें राहीन." उमर सोबानी यांनींहि आपली शेरवाणी टाकली आणि लुंगी स्वीकारली.

आणि तेव्हांपासून म. गांधी केवळ पंचा नेसूनच सर्वत्र वावरूं लागले. न सोसण्याजोगी हवा असेल तेव्हांच फक्त ते उपरणें वापरीत. एरवीं उघडे राहात. ते पुढें १९३१ सालीं इंग्लंडला गोलमेज परिषदेला गेले ते एवढ्याच वस्त्रा-निशीं आणि बादशहांच्या निमंत्रणावरून त्यांना भेटायला गेले तेहि याच वेषांत; याच वेषावरून विन्स्टन चर्चिल या मिस्किल ब्रिटिश पुढाऱ्यानें त्यांना "नागवा फकीर" म्हणून त्यांची हेटाळणी केली होती !

● ● ●

# आंतला आवाज

## : १५ :

रावी नदीच्या तीरावर, १९२९ च्या डिसेंबर महिन्याच्या ३१ तारखेला रात्रीं १२ वाजतां, राष्ट्रीय महासभेच्या मुखानें राष्ट्रानें इतके दिवस ब्रिटिश साम्राज्य सरकाराकडून स्वराज्य मिळण्याची वाट पाहून 'पूर्ण स्वातंत्र्य' असें आपलें साध्य ठरविलें. भारतीय तरुणांच्या क्रांतिकांक्षेचे, तडफेचे, अतुल त्यागाचे प्रतिनिधि पं. जवाहरलाल नेहरू यांनीं म. गांधी, पं. मोतीलाल नेहरू वगैरे मान्यवर नेत्यांचें मन या कामीं वळविण्यांत यश मिळविलें. आतांपर्यंत गांधीजी 'वसाहतींचें स्वराज्य' वाटलें तर साम्राज्यापासून फुटण्याच्या हक्कासह मागत होते, पण ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनीं मूर्खपणामुळें आणि काळानें त्यांची सद्दी संपवीत आणण्याचें ठरविल्यामुळें, तें नाकारलें व गांधीजींनींहि 'संपूर्ण स्वातंत्र्य' हें राष्ट्रीय महासभेचें साध्य इतःपर मान्य केलें व त्याचा पाठपुरावा आरंभिला. महासभेनें त्याकरितां करावयाच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीचीं सूत्रें गांधीजींच्या हातीं सोपविलीं.

ही चळवळ कोणत्या स्वरूपांत सुरू करायची ? ती परिणामकारक तर झाली पाहिजे, पण त्यांतून अत्याचाराला वाट फुटतां कामा नये. जहाल क्रांतिकारक ब्रिटिश सत्ता उलथून टाकण्याकरितां अधीर झाले होते, त्यांनाहि या चळवळीनें आवर घालतां आला पाहिजे, आणि राष्ट्राकरितां बलिदान करण्याची त्यांना संधि मिळाली पाहिजे.

लाहोरचें अधिवेशन झाल्यापासून गांधीजी यासंबंधीं विचार करीत होते. अर्थात् आपल्या विशिष्ट पद्धतीअनुसार या लढ्याच्या कार्यक्रमापूर्वीं आणि त्याच्या सोबत विधायक कार्यक्रमहि जारी ठेवण्याबद्दल ते सतत लोकांना आणि कॉंग्रेसला

शिकवण देत होते. हिंदु-मुसल्मान ऐक्य, अस्पृश्यता-निवारण आणि चरखा-प्रसार हीं कार्यक्रमाचीं मुख्य अंगें होतीं.

१८ जानेवारी १९३० रोजीं कांहीं कार्यक्रमानिमित्त गुरुदेव टागोर अहमदाबादेस आले असतांना त्यांनीं आश्रमांत गांधीजींची भेट घेतली. अर्थात त्यांच्या बोलण्यांत पुढचा कार्यक्रम हा विषय येणें अपरिहार्य होतें.

गुरुदेवांनीं गांधीजींना विचारलें, " पुढें कोणता लढाऊ कार्यक्रम हातीं घेण्याचा तुम्ही विचार केला आहे ? "

गांधीजींनीं प्रांजळपणानें उत्तर दिलें, " मला अजून कांहींच सुचत नाहीं. खरें म्हणजे मी रात्रंदिवस कसून विचार करीत आहें, पण भोंवतालच्या अंधारांत प्रकाशाचा एकहि किरण दिसत नाहीं ! "

एवढ्या मोठ्या राष्ट्राच्या एवढ्या मोठ्या लढ्याचा हा नेता, आणि याचे व्यूह अजून तयार नाहींत ! पण गांधी म्हणत होते, " मी आदेशाची मार्गप्रतीक्षा करीत आहें. ईश्वर मला मार्गदर्शन करील. "

आणि बरेच आठवडे गेल्यानंतर गांधीजींनीं व्हॉइसरॉयांना ता. २ मार्च रोजीं एक लांबलचक पत्र लिहून ९ दिवसांत आपण सविनय कायदेभंगाला सुरुवात करीत असल्याची नोटिस दिली. पत्रांत त्यांनीं व्हाइसरॉयांना ११ मुद्दे देऊन त्याबाबतींत हिंदुस्थानाला न्याय दिलात तर मी ही चळवळ मागें घेईन असें नम्रपणें विनविलें.

हें पत्र त्यांनीं रेजिनॉल्ड रेनॉल्डस नांवाच्या एका ब्रिटिश तरुणाच्या हातीं देऊन पाठविलें. हा तरुण क्वेकर-पंथी होता आणि गांधीजींच्या आध्यात्मिक विचारसरणीकडे ओढला जाऊन तो नुकताच आश्रमांत आला होता. जणूं ईश्वरानेंच त्याला हें ऐतिहासिक कार्य करण्याकरितां आणलें असावें.

पण व्हॉइसरॉयांचें उत्तर पत्राची सामान्य पोच देण्यापलीकडे आलें नाहीं. गांधी म्हणाले, " याचक होऊन मी भाकरी मागितली आणि मला धोंडा मिळाला. "

गांधीजींनीं सविनय कायदेभंगाचा आपला कार्यक्रम जाहीर केला. समुद्रकांठीं जाऊन आणि बेकायदा मीठ बनवून कायद्याचा भंग करण्याचें त्यांनीं ठरविलें. कॉंग्रेसमधल्या सहकाऱ्यांना आणि बाहेरच्याहि लोकांना डोंगर पोखरून महात्माजींनीं उंदीर काढला असें वाटलें. पण गांधी म्हणाले, " आंतल्या आवाजानें

मला दिलेला हा आदेश आहे." असल्या तुटपुंज्या कार्यक्रमानें काय होणार असें लोकांना आणि सरकारलाहि वाटलें, पण १२ मार्च रोजीं दांडीकूच सुरू झाली आणि साऱ्या देशभर उत्साह संचारला. ५ एप्रिल रोजीं समुद्रकांठीं पोचून गांधीजींनीं समुद्रांत स्नान केलें आणि बाहेर येऊन समुद्राच्या पाण्याचें तयार झालेलें चिमूटभर मीठ उचललें. जिकडे तिकडे सविनय कायदेभंगाची चळवळ जोरांत सुरू झाली आणि ब्रिटिश राज्यसत्तेला जबरदस्त धक्का बसला.

आणीबाणीच्या प्रसंगीं आपल्या 'आंतल्या आवाजा' कडून आदेश मिळ-ण्याची गांधीजी नेहमीं अपेक्षा करीत. त्यांना त्यासंबंधीं एकदां पृच्छकानें विचारलें असतां ते म्हणाले, "आंतला आवाज ही वर्णन न करतां येण्यासारखी वस्तु आहे. परंतु कित्येक वेळां आपल्याला अंतरांतून अमुक प्रेरणा झाली आहे, अशी प्रचीतीच येते. मी तो आवाज ओळखायला शिकलों तो काळ माझा प्रार्थना काळ म्हणतां येईल. म्हणजे साधारणपणें १९०६ च्या आसपासचा. अंतरात्म्याचा आवाज हें आपल्या बाहेरचें म्हणजे आपल्या अहंभावाच्या बाहेरचें बळ आहे. जेव्हां आपण सत् बळाशीं तदाकार होतों तेव्हां गूढ भाषेंत 'ईश्वर माझ्या द्वारां बोलत आहे' असें आपल्याला म्हणतां येतें. आपण सत्‌शी इतके तदाकार होऊन जातों कीं आपला अहम् त्यावेळीं शून्य होतो."

१९३२ सालीं, येरवड्याच्या तुरुंगांत पडले असतांना ब्रिटिश पंतप्रधान मॅक्डोनॉल्डच्या जातीय निवाड्यांत अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिल्याचें जाहीर झालें. हिंदु समाजाचीं शकलें करण्याचा हा डाव आहे आणि त्यानें अस्पृश्य समाज कायम अस्पृश्य म्हणूनच रहाणार आहे हें जाणून तो रद्द करण्याकरिता गांधीजींनीं आमरण उपोषण सुरू केलें होतें. त्या उपोषणाचा शेवट ब्रिटिश सरकारनें माघार घेण्यांत होऊन गांधीजींना तुरुंगांत राहूनहि बाहेरची अस्पृश्यता-निवारणाची चळवळ चालविण्याची मुभा सरकारनें दिली होती. सबंध देश अस्पृश्यता-निवारणाच्या कामीं झटूं लागला होता. आणि १९३३ मध्यें गांधीजींनीं पुनः आपण २१ दिवसांचा उपवास हरिजन-कार्याकरितां लागणारी स्वतःची आणि सहकाऱ्यांची आत्मशुद्धि व्हावी या हेतूनें करणार असल्याचें सरकारला कळविलें. हा निर्णय त्यांनीं आपल्या अंतरात्म्याच्या आदे-शाला अनुसरून केला होता. या बाबतींतला आपला अनुभव सांगतांना ते म्हणाले,

" तुरुंगांत २१ दिवसांचा उपवास करण्याचें मी ठरविलें तेव्हां त्याविषयीं मी अगोदर ऊहापोह केला नव्हता. आदल्या रात्रीं बिछान्यावर पडतांना दुसरे दिवशीं सकाळीं मी २१ दिवसांचा उपवास जाहीर करीन अशी कसलीच कल्पना मला नव्हती. पण मध्यरात्र झाली आणि एका आवाजानें मला जागें केलें. तो म्हणाला ' उपवास कर ' मी विचारलें, ' किती दिवस ? ' उत्तर आलें, ' एकवीस दिवस. ' तुम्हांला मी सांगतों, माझें मन या उपवासाला बिलकुल तयार नव्हतें, उलट मी नाखूष होतों. पण हा आदेश अगदीं स्पष्ट शब्दांत आला. आयुष्यांत माझ्याकडून कांहीं चकित करणाऱ्या गोष्टी घडल्या आहेत, त्या स्वबुद्धीनें प्रेरित होऊन मी केलेल्या नाहींत, आंतल्या प्रेरणेनें त्या मला करायला लावल्या आहेत. त्या प्रेरणेला मी ईश्वर म्हणेन. १९३० ची दांडीकूच घ्या. मिठाचा कायदेभंग कसा पार पाडायचा याची मला लेशमात्रहि कल्पना नव्हती. पं. मोतीलालजी आणि इतर सहकारी मित्र क्षुब्ध आणि साशंक मनःस्थितींत होते, मी काय करणार हें मी त्यांना सांगूं शकत नव्हतों, कारण खुद्द मलाच तें माहीत नव्हतें. पण वीज चमकावी तसें तें मला सुचलें आणि त्यानें पुढें सारा देश कसा हादरला तें प्रसिद्धच आहे..."

● ● ●

# हृदयाची भूक

: १६ :

" प्रार्थना ही आत्म्याची भूक आहे. वियोग झालेल्या हृदयाचा तो विलाप आहे. शरीराला अन्न जितकें आवश्यक आहे, त्याहूनहि प्रार्थना ही आत्म्याला अधिक आवश्यक आहे; " अशी गांधीजींची श्रद्धा होती. दक्षिण आफ्रिकेंत असल्यापासूनच त्यांनीं प्रार्थनेला आपल्या दैनंदिन जीवनांत आवश्यक स्थान दिलें होतें. प्रार्थनेच्या बाबतींत नियमितपणा त्यांनीं कधीं चुकविला नाहीं. आपल्याला सर्व शक्ति प्रार्थनेंतून मिळते असा त्यांचा अनुभव होता.

एकदां ते आंध्रमध्यें दौरा करीत होते. हा त्यांचा दौरा खादीप्रचाराचा होता. प्रत्येक ठिकाणीं त्यांचें दर्शन घ्यायला आणि त्यांचे शब्द ऐकायला चिकार गर्दी होत असे. वेळेवर सर्व कार्यक्रम उरकणें अशक्य होऊन गेलें. त्या दिवशीं आंध्रमधील चिकाकोल या गांवीं पोंचायला त्यांना रात्रींचे १० वाजले. तेथें उत्कृष्ट बारीक सूत कांतणाऱ्या बायांचा कातण्याच्या चढाओढीचा कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. गांधीजींच्या बरोबर काकासाहेब कालेलकर आणि महादेवभाई देसाई होते. ते दोघे थकून मुक्कामाच्या ठिकाणीं गेले; गांधीजी कार्यक्रमाच्या जागीं गेले.

पहांटे ४ वाजतां तिघेहि जण प्रार्थनेसाठीं उठले. हात तोंड धुऊन प्रार्थनेला बसले आणि गांधीजींनीं विचारलें, " काल रात्रीं झोपण्यापूर्वीं प्रार्थना केली का ? "

काकासाहेब म्हणाले, " आपण इथं पोचलों त्यावेळीं मी इतका थकून गेलों होतों कीं आल्याबरोबरच मी झोपी गेलों. प्रार्थनेची आठवणच राहिली नाहीं. आतां आपण विचारलंत तेव्हांच लक्षांत आलं कीं, अरे रात्रीची प्रार्थना राहूनच गेली. "

महादेवभाई म्हणाले, " मीहि असाच झोपायला गेलों, पण डोळा लागण्यापूर्वींच प्रार्थनेची आठवण झाली. म्हणून बिछान्यावर बसूनच प्रार्थना केली. काकांना उठवलें नाहीं. "

गांधीजी म्हणाले, " मी दीड एक तास कार्यक्रमाला बसलों. तिथून इतका दमून आलों कीं मीहि प्रार्थना करण्याचं विसरून गेलों आणि तसाच झोपी गेलों. दोन अडीच वाजतां डोळा उघडला तेव्हां एकदम लक्षांत आलं कीं रात्रीची प्रार्थना केली नाहीं. असा धक्का बसला कीं सारं शरीर थरथर कांपूं लागलं. मी घामानं डबडबून गेलों. उठून बसलों. अतिशय पश्चात्ताप केला. ज्याच्या कृपेनें मी जगत आहें, आपल्या जीवनाची साधना करीत आहें त्या परमेश्वरालाच मी विसरून गेलों ! केवढी मोठी चूक झाली ही ! मी परमेश्वराची क्षमा मागितली. पण तेव्हांपासून झोप आलीच नाहीं, मी तसाच बसून राहिलों. "

ही होती गांधीजींची निष्ठा.

ते कोणत्या देवाची प्रार्थना करीत होते ? महादेवाची, विष्णूची, गणपतीची कीं देवीची ?

गांधींनीं लिहिलें आहे : " प्रार्थनेकरितां मी साकार मूर्तीचा निषेध केलेला नाहीं पण निराकाराला मी वरचें स्थान देतों. असा भेद करणें कदाचित् बरोबरहि होणार नाहीं. कोणाला हें, कोणाला तें अनुकूल असूं शकतें. माझ्यापुरतें बोलायचें तर निराकार उपासना मला अधिक बरी वाटते. "

पण बहुजनसमाज मूर्तिपूजक आहे. म्हणून गांधीजींना मूर्तिपूजाहि ग्राह्य वाटत होती. एकदां शांतिनिकेतनांत गुरुदेव टागोर, अँड्रयूज, गांधीजी आणि बिशप फ्रेड फिशर हे एक अमेरिकन ख्रिश्चन धर्मोपदेशक एकत्र गोष्टी करीत बसले होते. गोष्टी मूर्तिपूजेसंबंधीं चालल्या होत्या. गांधीजींनीं सामान्य माणसाची बाजू घेऊन मूर्तिपूजेची तरफदारी केली. ते म्हणाले, " त्या घेड-भंग्याचा शेंदूर माखून झाडाखालीं पूजलेला लाल गोटा, तो तुम्हांला आम्हांला दगडाचा गोटा आहे, पण ज्ञानाची न् विद्येची उपासमार झालेल्या, शेकडों वर्षं वाळींत टाकलेल्या त्या अंत्यजाला साक्षात् डोळ्यांना दिसणारं देवाचं तेंच एक स्थान आहे. त्याच्यामधला अन् परमेश्वरामधला हा एकच एक दुवा आपण नाकारून कसं चालेल ? "

पण टागोरांनीं गांधींना पुढें बोलूं दिलें नाहीं. ते म्हणाले, " तुम्ही, गांधीजी, तुम्ही न् तुमच्या जैनपूर्वजांनीं आपलं वेदपठण, भजन-गान न् जपजाप्य केव्हांच सोडून दिलं आहे. आपल्याला चांगलं माहीत आहे कीं ईश्वर फक्त देवळांतच नाहीं. नांगर धरणारा शेतकरी जिथं खडक फोडून जमीन भुसभुशीत करीत आहे तिथं तो आहे. तो उन्हापावसांत त्यांच्या सांगातीं असतो, त्याचीं वस्त्रं धुळीनं माखलेलीं आहेत. या ब्रिशपना विचारा, त्यांचा प्रभु-साक्षात् भगवान् मानवाशीं तादात्म्य दाखविण्याकरितां मानव बनला अन् तो तिन्ही त्रिकाळ आमच्यांत ओतप्रोत झालेला आहे, हें त्यांना माहीत आहे पण याचा अर्थ तो हा दगडगोटा म्हणजे परमेश्वर असा नाहीं. "

गुरुदेव पुढें म्हणाले, " छेः छेः, आपण जे इथं या खोलींत बसलेले आहोंत त्यांना जर मूर्ति न् मूर्तिपूजा, जपमाळ न् शेंदूर फासलेले दगड यांची गरज वाटत नसेल, आपल्याला जर त्यांत पुण्य वाटत नसेल, तर तें इतरांनाहि पुण्य वाटण्याचं कारण नाहीं, मग ते लोक कितीहि हीन असोत. मी तर शहरा-शहरांतल्या न् खेड्याखेड्यांतल्या प्रत्येक मोहोल्ल्यांतून अन् देवळांतून पितळेची, लाकडाची, दगडाची कसलीही न् कोणतीही मूर्ति काढून टाकून त्यांचा एकत्र ढीग करीन न् समुद्रांत त्यांना जलसमाधि देऊन सर्व सफा करून टाकीन ! "

गुरुदेवांच्या या आवेशपूर्ण उद्गारांनंतर कांहीं क्षण सर्वजण स्तब्ध झाले. मग गांधींच्या मुखांतून गंभीरपणें अंत्यज बोलला,

" लंगड्या माणसाला चालायचं कसं तें तुम्ही शिकवलं नाहींत तोंवर त्याच्या बगलेंतल्या कुबड्या तुम्हांला कशा काढून घेतां येतील ? तें या ब्रिशपचं, अँड्र्यूचं, माझं न् गुरुदेव, तुमचं काम आहे ! "

• • •

## संतांचें भांडवल : १७ :

१९३९ च्या डिसेंबरमधील गोष्ट. गांधीजी सायंकाळच्या प्रार्थनेच्या वेळेपूर्वी तासभर अगोदर बाहेर फिरायला निघाले होते. पांच सात मंडळी त्यांच्या सोबत होती. सेवाग्राम आश्रमाच्या फाटकाच्या बाहेर ते पडतात न पडतात तोंच एक व्यक्ति त्या फाटकांतून आंत जाण्याकरितां आलेली बाहेरच थबकली. त्यांनीं आपल्या खांद्यावरचें गाठोडें खालीं उतरलें आणि गांधीजींच्या पुढें येऊन त्यांना साष्टांग नमस्कार घातला. गांधीजींनीं त्यांना उलट नमस्कार केला आणि म्हटलें, " तुमचं पत्र मला मिळालं होतं. पण माझं उत्तर मिळाल्यानंतरच तुम्ही निघाल असं मी समजलों होतों " आलेली व्यक्ति या शब्दांनीं थोडी वरमली. ते म्हणाले, " व्हॉइसरॉयना भेटल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशीं प्रसिद्ध झालेलं आपलं करुणापूर्ण निवेदन मी वाचलं न् मला राहावलं नाहीं आपल्याकडे यावं न् निदान दोन दिवस तरी राहावं अशी मनांत तळमळ झाली. आश्रमांत येण्याला आपली परवानगी मिळण्याची मी वाट पाहायला हवी होती, पण मला मुळीं राहवलंच नाहीं, आणि हरद्वार सोडून मी आपल्याकडे आलों. "

गांधीजी म्हणाले, " तुम्हांला कोणती व्यथा आहे हें मला माहीत आहे आणि मी मनांत ऊहापोहच करीत होतों कीं आश्रमांत इतके स्त्री-पुरुष, मुलं न् रुग्ण रहाताहेत त्यांच्या सान्निध्यांत तुम्हांला ठेवणं योग्य होईल कीं कसं ? "

आलेली व्यक्ति दुसरे तिसरे कोणी नव्हते, परचुरेशास्त्री होते. १९३२ मध्यें येरवडा तुरुंगांत त्यांचा गांधीजींशीं परिचय झाला होता. त्यावेळीं ते उतारवयाचे असले तरी उत्तम प्रकृतीचे होते. पुढें त्यांना दुर्दैवानें, कसा कुणास ठाऊक, महारोग जडला. त्यांनीं पत्नी-मुलांचा त्याग केला. रोगावर उपचार

करण्याकरितां अनेक इस्पितळांतून ते हिंडले. त्यांचीं गात्रें हळू हळू विद्रूप होत चाललीं. शेवटीं कंटाळून ते हरद्वारला जाऊन राहिले होते. त्यांचा संस्कृतचा प्रगाढ व्यासंग, तीक्ष्ण बुद्धिमत्ता आणि त्याचबरोबर श्रद्धा-भक्तिमय हृदय यांची गांधीजींना चांगलीच ओळख होती.

गांधीजींचे उद्गार ऐकून शास्त्रीबुवा म्हणाले, " आपली अडचण मी जाणतों. मला आपलं दर्शन झालं, मी कृतार्थ झालों. या गाठोड्यांत मी हरद्वारला आतां-पर्यंत कांतलेल्या सूतगुंड्या आपल्याला प्रत्यक्ष द्याव्यात म्हणून आणल्या आहेत. माझं काम झालं. पलीकडच्या झाडाखालीं मी आजची रात्र काढीन अन् सकाळीं परत हरद्वारची वाट धरीन. "

" तुमचं जेवण केव्हां झालंय् ? " गांधीजींनीं त्यांना विचारलं आणि आपला नातू कनू याला त्यांना जेवूं घालण्यास सांगितलें. इतकें करून ते फिरायला निघाले.

नेहमी गांधीजी फिरण्याच्या वेळांत विनोद करीत, मुलांशीं खेळत, गप्पा मारीत, आणि अशा रीतीनें सबंध दिवसभर डोक्यावर असलेला शीणभार उतरून टाकीत. पण आज ते अतिशय गंभीर झाले होते. त्यांच्या अंतःकरणांत प्रचंड खळबळ चालली असल्याचें त्यांच्या मुद्रेवर दिसत होतें.

प्रार्थना झाली. थोडा मसाज व्हायचा तो झाला आणि गांधीजी अंथरुणावर पडले.

पण शरीरच पडलें होतें, आत्मा आंतल्या आंत अस्वस्थ असावा. त्यांना चांगली झोप लागली नाहीं. बुद्धीशीं आणि मनाशीं आत्म्याची झुंज बराच काळ चालली असावी. शेवटीं आत्म्याचा विजय झाला आणि गांधीजींच्या मनाचा निर्णय झाला. रात्रीं २ वाजतांच ते उठून बसले.

पहाटे प्रार्थना झाल्यानंतर आपल्यापुढें निकडीनें आलेला प्रश्न त्यांनीं आश्रम-वासीयांना सर्व बाजूंनीं समजावून दिला. ते म्हणाले, " परचुरेशास्त्र्यांच्या रूपानें परमेश्वरच माझी सेवावृत्तीची कसोटी घ्यायला आला आहे, अशी माझी भावना आहे. आपल्या बिकट अवस्थेंत आधार शोधण्याकरितां म्हणून परचुरे शास्त्री माझ्याकडे आले असतांना ते महारोगी आहेत म्हणून त्यांना धुडकावून लावणें म्हणजे परमेश्वरालाच धुडकावून लावण्यासारखं आहे. अर्थात् आश्रमांतल्या लोकांच्याहि सुरक्षिततेची जबाबदारी ईश्वरानं माझ्यावर सोपविली आहे. तुमच्या

सन्निध परचुरे शास्त्र्यांना मी ठेवणार नाहीं. पण आश्रमांत आपले कुटुंबी जन म्हणून त्यांना घेण्याकरितां तुमची संमति मला पाहिजे.

आश्रमांतल्या मंडळींनीं उदार हृदयानें परचुरेशास्त्र्यांना आपल्यांत घेण्यास आपली हरकत नसल्याचें सांगितलें आणि गांधीजींच्या अंतःकरणावरचें मोठें ओझें कमी झालें.

त्यांनीं परचुरेशास्त्र्यांकरितां लगेच एक कामट्यांची झोपडी आपल्या झोपडीशेजारीं उभी केली. वर छप्पर म्हणून पांढरी शुभ्र खादी टाकली. त्यांतून सूर्यकिरण आंत यावेत असा उद्देश. सूर्योदयाच्या सुमाराला परचुरेशास्त्री आश्रमवासी बनले. त्यांच्या हर्षाला पार उरला नाहीं.

गांधीजींनीं सेवाग्रामला असतांना रोज त्यांच्याकडे येऊन पांच मिनिटें त्यांची विचारपूस आणि शुश्रूषा करून जाण्याचा नित्यनियम ठेवला होता. आणि परचुरे शास्त्री या प्रेममय विभूतीच्या सहवासांत ब्रह्मानंदाचें सुख अनुभवीत होते !

● ● ●

मराठी ...
अनुक्रम ...
क्रमांक ... नोंद दि. ...

# गांधीजींचा धांवता जीवनपट

२ आक्टोबर, १८६९—पोरबंदर ( काठियावाड ) येथें जन्म.

१८८३ सालीं ( वय १३ )—कस्तुरबाईशीं लग्न, मॅट्रिक परीक्षा पास.

१० जून, १८९१ ( वय २२ )—बॅरिस्टरीची परीक्षा इंग्लंडमध्यें उत्तीर्ण.

एप्रिल १८९३ ( वय २४ )—दक्षिण आफ्रिकेस ( नाताळला ) एका खटल्याकरितां प्रयाण.

१८९४ ( वय २५ )—खटल्यांत वादी-प्रतिवादींची आपापसांत तडजोड घडवून आणली; नाताळ इंडियन कॉंग्रेसची स्थापना केली.

१८९६ ( वय २७ )—हिंदुस्थानांत सहा महिन्यांकरितां आले. कुटुंबासह नाताळला ता. १३ जानेवारी १८९७ रोजीं पोंचले.

१८९९–१९०० ( वय ३१ )—इंग्रज-बोअर युद्धांत हिंदी लोकांच्या वतीनें शुश्रूषापथक काढलें.

डिसेंबर १९०१—हिंदुस्थानांत कायमचे म्हणून परत आले व कलकत्त्याच्या कॉंग्रेसकरितां स्वयंसेवक बनले.

१९०२ ( वय ३३ ) मुंबईला वकिलीची कचेरी उघडली, पण पुनः दक्षिण आफ्रिकेकडून तार येतांच परत तिकडे गेले.

१ मार्च १९०४ ( वय ३५ )—‘ इंडियन ओपीनियन ’ साप्ताहिकाचा भार आपल्या अंगावर घेतला; ‘ अन् टु धिस लास्ट ’ वाचून जीवनांत पालट घडविला, ‘ फिनिक्स वसाहतीची स्थापना.

एप्रिल, मे १९०६ ( वय ३७ )—झुलू बंड ( ? ) झुलू जखमींची सेवा. ब्रह्मचर्याचें व्रत घेतलें.

१ जुलै १९०७—एशियाटिक रजिस्ट्रेशन कायदा द. आ. सरकारनें पास केला. त्याविरुद्ध ‘ पॅसिव्ह रेझिस्टन्स ’ ( सत्याग्रहा ) चा लढा सुरू केला.

१० जानेवारी १९०८ ( वय ३८ )—तुरुंगवासाची पहिली शिक्षा आणि त्यानंतर आणखी दोन वेळां शिक्षा.

२२ आक्टोबर १९१२—ना. गोखल्यांची द. आफ्रिकेला भेट.

२१ जानेवारी १९१४—द. आ. सरकारनें नमतें घेऊन इंडियन रिलीफ ॲक्ट पास केला व सर्व अन्याय दूर केले.

१८ जुलै १९१४ ( वय ४५ ) गांधीजी परिवारासह कायमचे हिंदुस्थानला येण्याकरितां लंडनमार्गें निघाले. याच वेळीं पहिल्या महायुद्धाला सुरुवात झाली, त्यांत ब्रिटिशांच्या वतीनें भाग घेण्याकरितां म्हणून लंडनमधील हिंदी लोकांचें शुश्रूषापथक काढलें.

९ जानेवारी १९१५ ( वय ४६ ) प्ल्युरिसीनें आजारी पडून हिंदुस्थानात परत.

४ फेब्रुवारी १९१६ ( वय ४७ )—बनारस हिंदु युनिव्हर्सिटीच्या स्थापनेच्या वेळचें प्रसिद्ध भाषण.

एप्रिल ते जून १९१७—चम्पारण्यांतील निळी मळेवाल्यांविरुद्ध यशस्वी लढा.

१९१८ ( वय ४९ )—अहमदाबाद मिल मालक व मजूर यांच्यामधील लढ्यांत भाग. मजूर महाजनची स्थापना. खेडा जिल्ह्यांत रिक्रूट भरतीचें अयशस्वी कार्य. गंभीर आजार.

१८ मार्च १९१९—रौलेट कायदा पास झाला.

६ एप्रिल १९१९ ( वय ५० )—या कायद्याविरुद्ध निदर्शन म्हणून देशभर हरताळ पाळण्याचा आदेश दिला. सविनय कायदेभंगाची तयारी.

१३ एप्रिल—जलियांवाला बाग कत्तल. पंजाब पुढाऱ्यांच्या निमंत्रणावरून तिकडे जात असतां वाटेंत अटक व मुंबईस सुटका.

ऑक्टोबर—‘ यंग इंडिया ’ व ‘ नवजीवन ’ पत्रांचे संपादक.

२४ नोव्हेंबर—अ. भा. खिलाफत कॉन्फरन्स, गांधीजी अध्यक्ष. परदेशी वस्त्रबहिष्कार व स्वदेशी-पुरस्कार.

२८ मे १९२० ( वय ५१ )—खिलाफत कमिटीचा व पुढे मुस्लीम कॉन्फरन्सचा सरकारशीं असहकाराचा ठराव.

२६ डिसेंबर–नागपूर काँग्रेसच्या अधिवेशनांतही असहकाराचा ठराव पास. गांधीजींनीं बनविलेली काँग्रेस घटना मंजूर. ‘ १ वर्षांत स्वराज्य ’ घोषणा.

१८ मार्च १९२२ ( वय ५३ )–राजद्रोहाचा खटला चालून ६ वर्षें साध्या कैदेची शिक्षा.

५ फेब्रुवारी १९२४ ( वय ५५ )–तुरुंगात अ‍ॅपेंडिसायटिसचें ऑपरेशन व सुटका

१८ सप्टेंबर–कोहाट इ. ठिकाणच्या हिंदु–मुसलमान दंग्याबद्दल २१ दिवसांचा उपवास.

डिसेंबर ( वय ५६ )–बेळगांव काँग्रेसचे अध्यक्ष.

३१ डिसेंबर १९२९–संपूर्ण स्वातंत्र्य काँग्रेसचें ध्येय; लाहोर कांग्रेसमध्यें मंजूर, गांधीजींकडे सविनय कायदेभंगाचे सर्वाधिकार.

१२ मार्च १९३० ( वय ६१ )–प्रसिद्ध दांडीकूचला प्रारंभ.

६ एप्रिल–मिठाचा कायदेभंग.

१२ एप्रिल–स्वराज्य मिळाल्याशिवाय आश्रमांत न परतण्याची प्रतिज्ञा.

मे १९३०–कराडी येथें गांधीजींना अटक व येरवड्यास स्थानबद्ध. कायदेभंग सर्वत्र जोरांत चालू.

२५ जानेवारी १९३१–गांधीजींची व पुढाऱ्यांची सुटका, व्हॉइसरॉयाशीं वाटाघाटी.

६ मार्च–गांधी-आयर्विन तह.

१० जून १९३१–काँग्रेस वर्किंग कमिटीनें गोलमेज परिषदेला काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधि म्हणून गांधीजींची नेमणूक केली.

१२ सप्टेंबर–गांधीजी लंडनला पोंचले.

२८ डिसेंबर–लंडनहून परत. तेथें असलेल्या मुदतींत परिषदेंत काँग्रेसची भूमिका उत्कृष्टपणें मांडली, जनतेलाहि उत्तम प्रकारें समजाविली.

४ जानेवारी १९३२ ( वय ६३ )–गांधीजींना अटक व येरवड्यास स्थानबद्ध

१८ ऑगस्ट–ब्रिटिश पंतप्रधानांचा जातीय निवाडा आणि त्याबाबत गांधीजींचें आमरण उपोषण सुरू.

२६ सप्टेंबर—सरकारनें गांधी व अस्पृश्य नेते यांच्यामधील तडजोड मान्य करून आपला निवाडा मागें घेतला. गांधीजींचें उपोषण सुटलें. अस्पृश्यता-निवारणाची चळवळ सुरू.

७ नोव्हेंबर—तुरुंगांत राहूनहि गांधीजींना अस्पृश्यता-निवारणाकरितां चळवळ चालविण्याची पूर्ण मोकळीक दिली.

८ मे १९३३ ( वय ६४ )—हरिजन सेवेला अधिक पात्र बनावें म्हणून तुरुंगांतच आत्मशुद्धीकरितां २१ दिवसांचें उपोषण. सुटका.

२६ जुलै—साबरमती आश्रम बंद केला व सर्व मालमत्ता सरकारला देऊं केली. पण सरकारनें नाकारतांच ती सर्व हरिजन कार्याला देऊन टाकली.

४ ऑगस्ट—वैयक्तिक कायदेभंगाबद्दल १ वर्षाची कैद. पूर्वीच्या सर्व सवलती सरकारनें बंद केल्या. गांधीजींचा फिरून उपवास.

२३ ऑगस्ट—विनशर्त सुटका. पण शिक्षेची मुदत पूर्ण होईपर्यंत सविनय कायदेभंग करणार नसल्याची व फक्त हरिजन कार्य करण्याची घोषणा.

नोव्हेंबर—हरिजन दौरा. ८ लाख रुपये जमा केले.

ऑक्टोबर १९३४ ( वय ६५ )—काँग्रेसमधून बाहेर पडले. अ. भा. ग्रामोद्योग संघ काँग्रेस अंतर्गत स्थापन केला. विधायक कार्याकडे पूर्ण लक्ष.

जुलै १९३७—१९३५ च्या कायद्यानुसार फेब्रुवारींत निवडणुका होऊन बहुतेक प्रांतांत काँग्रेस बहुमतानें निवडून आली. गांधीजींच्या सल्ल्यानुसार मंत्रिपदें कांहीं अटींवर ग्रहण केलीं.

३ मार्च १९३९ ( वय ७० )—राजकोटच्या ठाकोरनी लोकांनीं दिलेलें अधिकारदानाचें वचन मोडल्याबद्दल राजकोट येथें आमरण उपवास.

७ मार्च—हिंदुस्तानचे मुख्य न्यायाधीश सर मॉरिस ग्वायर यांच्या लवादाला ठाकोरनी मान्यता दिल्यानें उपवास सोडला.

३ सप्टेंबर—दुसऱ्या जागतिक युद्धाची सुरवात.

२ जुलै १९४० ( वय ७१ )—गांधीजींनीं ‘ प्रत्येक ब्रिटिश नागरिकास ’ हें प्रसिद्ध निवेदन जाहीर करून हिटलरशी अहिंसातंत्रानें सामना देण्याची विनंती केली.

१८ ऑगस्ट १९४०—कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें सरकार विरुद्ध लढा सुरू करण्याचे अधिकार पुनः गांधीजींच्या हातीं सोपविले.

११ ऑक्टोबर १९४०—गांधीजींनीं वैयक्तिक सविनय कायदेभंगाची मोहीम सौम्य स्वरूपांत सुरु केली. विनोबा भावे हे पहिले सत्याग्रही म्हणून निवडले.

१९४१—कायदेभंगाची मोहीम देशभर सुरू राहिली.

एप्रिल १९४२—महायुद्धांत जर्मनी-जपानची सरशी होत होती. जपाननें रंगून जिंकलें. लढाई हिंदुस्थानच्या दाराशीं येऊन ठेपली.

६ जुलै—वर्किंग कमिटीच्या बैठकींत ' भारत छोडो ' ठराव पास. लढा सुरू झाला तर गांधीजींच्याकडे अधिकार.

८ ऑगस्ट १९४२ ( वय ७३ )—मुंबईला अ. भा. कॉंग्रेस कमिटीपुढें गांधीजींनीं ' भारत छोडो ' ठरावावर २॥ तास भाषण केलें.

९ ऑगस्ट—गांधीजींना अटक व आगाखान महालांत स्थानबद्ध.

१५ ऑगस्ट—महादेवभाई देसाईंचा अकस्मात् आगाखान महालांत मृत्यु.

१० फेब्रुवारी ते २८ फेब्रु. १९४३ ( वय ७४ )—सरकारशीं पत्रव्यवहार केल्यानंतर भलते आरोप करून आपल्याला अन्यायानें डांबून ठेवल्या. बद्दल गांधीजींनीं २१ दिवसांचा उपवास पूर्ण केला.

२२ फेब्रुवारी १९४४ ( वय ७५ )—कस्तुरबा गांधींची प्रकृति खालावत जाऊन आगाखान कारावासांत मृत्यु.

८ मे १९४४—गांधीजींची प्रकृति-अस्वास्थ्याबद्दल सुटका. गांधीजींना सुटकेची लाज वाटली.

२९ जुलै—हिंदु-मुसलमान प्रश्न मिटविण्याकरितां गांधीजींशीं बोलणें करण्याचा मि. जिनांना मुस्लिम लीगकडून अधिकार.

३ ऑगस्ट १९४५ ( वय ७५ )—गांधीजी सेवाग्रामला परतले.

९ ते २६ सप्टेंबर—गांधीजी-जिना यांचीं बोलणीं झालीं पण निष्पन्न कांहीं झालें नाहीं. जिनांची पाकिस्तानची मागणी कायम.

१४ ऑगस्ट १९४५—जपानची शरणागति.

फेब्रुवारी १९४६ ( वय ७६ )—देशांत अन्नाची चणचण मोठ्या प्रमाणांत गांधीजींनीं अन्नस्वावलंबनाचा घोष सुरू ठेवला. निसर्गोपचाराचा प्रचार.

२३ मार्च—क्रिप्स मिशन हिंदुस्थानांत आलें.

१६ मे—क्रिप्समिशननें हिंदुस्थानांतून ब्रिटिश सत्ता काढून घेणें हें ब्रिटनचें ध्येय जाहीर केलें व त्याकरिता एक योजना सुचविली.

२ सप्टेंबर १९४६—कॉंग्रेसनें तात्पुरतें मध्यवर्ती सरकार बनविलें. जवाहरलाल नेहरू मुख्य मंत्री. जिनांनीं हा सुतकाचा दिवस पाळा असा मुसलमानांना आदेश दिला. सर्वत्र दंगे व कत्तली.

१९ डिसेंबर १९४६ ते ४ मार्च १९४७—बंगालमधील नवाखली विभागांत शांति-पदयात्रा.

मार्च व एप्रिल १९४७—बिहारमधील जातीय हत्याकांड शमविण्याकरितां दौरा.

मे ते जुलै अखेर—दिल्लीला मुक्काम.

ऑगस्ट व सप्टेंबर-कलकत्ता येथील दंगे शमविण्याचे प्रयत्न. त्याकरितां उपवास.

डिसेंबर १९४७—जातीय दंगा शमविण्याकरितां दिल्ली येथें पुनः उपवास. प्रार्थना-प्रवचनांतून लोकशिक्षण.

२० जानेवारी १९४८ ( वय ७९ )— सायंप्रार्थना चालू असतां बॉंबचा धडाका.

२९ जानेवारी—कॉंग्रेस संघटनेच्या भावी स्वरूपाविषयीचा कच्चा खर्डा तयार केला.

३० जानेवारी—प्रार्थनेला जात असतां तीन गोळ्या लागून मृत्यु.

• • •

मराठी ...
अनुक्र. ७०० ... दि. ९१।९१
क्रमांक ...
म. ग्रं. सं. ठाणें, ...
.९.२.५.९२
IRBK-0112812